MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक ९ / सप्टेंबर २०१८


## संपादकीय

## बुद्धिदेवता, विवेकवादी की विनाशवादी ?


सप्टेंबर २०१८ मध्ये डब्लीन, आयर्लंड आणि महाराष्ट्रात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या.

डब्लीन आयर्लंडमध्ये बुद्धीला चालना देणारी व्याख्यानमाला आयोजित केली गेली, तर महाराष्ट्रामध्ये सालाबादप्रमाणे बुद्धीदेवतेची विटंबना होईल, असा गणेशोत्सव साजरा केला गेला. दोन्हीही घटना राजकीय इच्छाशक्ती काय करू शकते याची जीवंत उदाहरणे आहेत.

एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger 1879-1955) यांनी १९४३ साली What is Life ? या शीर्षकाखाली डब्लीन, आयर्लंड येथे तीन व्याख्यानं दिली होती. लगेचच म्हणजे १९४४ साली याच शीर्षकाखाली त्यांची ही व्याख्यानं छापली गेली. त्यांच्या या व्याख्यानांमुळे पदार्थ-विज्ञानाप्रमाणेच जीवशास्त्रालाही एक नवीन दृष्टी मिळाली होती. जैवशास्त्रामध्ये पुढे झालेल्या क्रांतीची बीजे या भाषणात होती, असे म्हटले तर गैर ठरणार नाही. याच घटनेला ७५ वर्षे पुरी झाली म्हणून डब्लीनमधील प्रसिद्ध The National Concent Hall मध्ये बुधवार ५ सप्टेंबर आणि



Erwin Schrodinger (second right front row) with Éamon de Valera at a meeting of the Dublin Institute of Advanced Studies in 1942



आवाजी विसर्जन

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

गुरुवार ६ सप्टेंबर २०१८ ला वैज्ञानिकांची एक मोठी परिषद भरवली गेली. जगातील नवभौतिकीपासून नवजीवशास्त्रामध्ये कार्यरत असलेल्या सुमारे २४ अव्वल दर्जाचे वैज्ञानिक यात सामील झाले होते.

विज्ञान हे नेहमी प्रवाहीच असते. जनुकशास्त्र (Genetics), मानवी चेतनेशी निगडित असलेले विज्ञान (consciousness studies), आणि बोधनिक विज्ञान (congnitive science), यामध्ये काम करणारे हे बहुसंख्य वैज्ञानिक होते. १९४३ साली श्रोडिंगर यांच्या भाषणामुळे जैव विज्ञानाला जशी एक नवीन दिशा मिळाली तशीच दिशा आणि स्फूर्ती वैज्ञानिकांच्या या चिंतनामधून मिळणार असल्याचे वैज्ञानिकांचे मत आहे.

श्रोडिंगर यांनी १९४३ साली आपण एका गहन आणि कठीण विषयावर बोलणार असल्याचे लोकांना सांगितले होते. १९३३ सालीच त्यांना पदार्थ विज्ञानामधे नोबेल पारितोषिक मिळाले होते. कठीण विषय मांडणार हे सांगूनही सुमारे ४०० जणांनी त्यांच्या या भाषणाला हजेरी लावली होती. ७५ वर्षांनंतरही डब्लीनमध्ये झालेल्या अलीकडच्या भाषणालाही इतका प्रचंड प्रतिसाद होता की, त्याच्या नोंदणी आणि प्रतिक्षा यादी दोन्हीही बऱ्याच आधी थांबवाव्या लागल्या.

एका सुसंस्कृत समाजाचे हे लक्षण नाही का?

आयर्लंड हा तसा लहान देश. उत्तर आयर्लंड हा इंग्लंडमधे समाविष्ट असून दक्षिण आयर्लंड हा स्वतंत्र देश आहे. भारतासारखेच आयर्लंडलाही ब्रिटिशांच्या वसाहतवादा विरुद्ध लढा द्यावा लागला. म्हणूनच असेल कदाचित, भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला आयरिश जनतेचा नेहमीच पाठिंबा होता.

१८४५ मध्ये आयर्लंडमध्ये प्रचंड दुष्काळ पडला. यांत लाखोंनी आयरिश लोक मृत्युमुखी पडले आणि अनेक आयरिश इतर राष्ट्रांमधे स्थलांतरीत झाले. यावेळी अमेरिकेत स्थलांतरीत झालेल्या आयरिश लोकांची संख्या मोठी होती.

Eamon de Valera (1882 - 1975) हे २० व्या शतकातील आयर्लंड मधील एक मोठे राजकीय व्यक्तिमत्त्व. १९५९ साली आयर्लंडचे अध्यक्ष म्हणून ते निवडून आले. आयर्लंडला स्वतंत्र घटना मिळवून देण्यामध्ये त्यांच्या मोठा वाटा होता. १९१६ मध्ये ब्रिटिश साम्राज्यवाद्यांविरुद्ध दिलेल्या लढ्याचे ते एक नेते होते. याकरता त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली गेली. अर्थातच पुढे त्याचे रूपांतर फक्त तुरुंगवासामध्ये झाले.

आयर्लंड हा एक कट्टर कॅथॉलिकपंथी देश. राष्ट्रनिर्मिती म्हणजे नव्या चर्चेसची बांधणी नाही, हे डी वॅलेरा या द्रष्ट्या नेत्याला पक्के ठाऊक होते. अमेरिकेत स्थलांतरीत झालेल्या आयरिश नागरिकांचा तेथील विज्ञान क्रांतीमधील सहभाग त्यांच्या डोळ्यांसमोर होता. अमेरिकेतील प्रिन्सस्टन विद्यापीठातील विज्ञानाच्या प्रगत अध्ययनासाठी असलेल्या केंद्रासारखी एखादी संस्था, त्यांना डब्लीन मध्ये काढायची होती. प्रिन्सस्टन मधील या संस्थेचे प्रमुखपद एकेकाळी आइन्स्टाईन यांनी भूषविले होते. अशाच तोडीच्या वैज्ञानिकाचा शोध वॅलेरा यांनी चालू केला आणि त्यात त्यांना यशही आले. एर्विन श्रोडिंगर यांना त्यांनी आपल्या या नवीन संस्थेचे पद देऊ केले आणि श्रोडिंगर यांनी ते स्वीकारलेही.

डब्लीन मधील School for Theoretical Physics या डि वॅलेरानी स्थापन केलेल्या संस्थेचे

(पृष्ठ क्र.४० वर)





वर्ष एकोणिसावे/अंक ९/सप्टेंबर २०१८



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | विकासवेध-०९: जगातील सर्वात मोठा प्रकल्प | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची - थोरली गुंज / रतनगुंज | श्री. प्रकाश दुधाळकर | ६ |
| ४) | 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ८ |
| ५) | विना सहकार नाही उद्धार (?) | अपर्णा कुलकर्णी | १७ |
| ६) | अमृतवाणी संस्कृतभाषा | डॉ. व्यंकट पु. धर्माधिकारी | २० |
| ७) | पूर्वांचलच्या सावलीत : उत्तर पूर्व राज्यांची सफर | गौरी अंबाजी परब | २४ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २८ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.


- संपादक

# विकासवेध-०९: जगातील सर्वात मोठा प्रकल्प

*इतिहासातील सर्वात महत्त्वाकांक्षी आणि खर्चिक अभियांत्रिकी प्रकल्प 'मॅनहटन प्रकल्प' विषयी माहिती या लेखात दिली आहे - संपादक*

विसाव्या शतकातील सर्वात मोठा प्रकल्प अणुस्फोटक निर्मितीचा होता. ह्या प्रकल्पाचे सांकेतिक नाव 'मॅनहटन प्रकल्प' असे होते. ह्या अणुस्फोटास परिणती देण्यास, जनरल लेस्ली ग्रुव्हज आणि जे. रॉबर्ट ओपेनहॅमर ही दोन माणसे प्रामुख्याने जबाबदार होती. हा प्रकल्प पुढे इतिहासातील सर्वात महत्त्वाकांक्षी आणि खर्चिक अभियांत्रिकी प्रकल्प ठरला. हा प्रकल्प १९३९ साली छोट्या प्रमाणावर सुरू झाला. १९४२ ते १९४५ दरम्यान अत्यंत जोमात चालला आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी विसर्जित करण्यात आला. त्यात सुमारे १,३०,००० लोक काम करत होते व त्यावर एकूण २ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा खर्च त्या काळात करण्यात आला (१).

न्यू मेक्सिकोतील अल्बुकर्कच्या दक्षिणेस १२० मैलांवरील अमेरिकेच्या अलामागार्डो भूदलाच्या, बिकिनी बेटावरील हवाई तळावरील एका उंच लोखंडी मनोऱ्यावर, स्थानिक वेळेनुसार, १६ जुलै १९४५ रोजी सकाळी ०५.३० वाजता, जगातील पहिला ज्ञात अणुस्फोट करण्यात आला. प्रथम एक डोळे दिपवणारा प्रकाश फाकला. १० मैलांवरील पर्वतही पहाटेच्या क्षितिजावर सर्व तपशीलासहित स्पष्ट कोरले गेले. नंतर भव्य भट्टीच्या उघड्या दरवाज्यातून यावी तशी तीव्र उष्णतेची लाट आली. वाळवंटावर एक हादरा तरंगत गेला, ज्यामुळे अधिकृत प्रेक्षकांना धराशायी व्हावे लागले. पाठोपाठ झालेल्या गडगडाटाने त्यांच्या कानाचे पडदे दुखावले. कुठल्याही तोफगोळ्यापेक्षा मोठा भयरव होता तो. एक भव्य अग्निगोल आकाशाकडे झेपावत होता, तेव्हा त्या भयरवाचे ध्वनी आणि प्रतिध्वनी उमटतच होते. यानंतर कुत्र्याच्या छत्रीच्या आकाराचा ढग ४०,००० फुटांपर्यंत उंच उठला. इतिहासात पहिल्यांदाच अणुस्फोटकाचा प्रयोग करण्यात आलेला होता आणि जग यापुढे कधीच पूर्वीसारखे राहणार नव्हते.



२५ जुलै १९४६ : ८ मैलांवरून उडणाऱ्या विमानातून टिपलेल्या प्रकाशचित्रात, अणुस्फोटामुळे उठलेला विस्फारता ढग, बिकिनी बेटावर ५,५०० फुटांपर्यंत उंच गेलेला दिसत आहे. हादऱ्याचे प्रारण मोजण्यासाठी, जुन्या युद्धनौका जवळच नांगरून ठेवलेल्या आहेत. (न्यू यॉर्क पब्लिक लायब्ररी).

मनोऱ्याभोवती विविध प्रकारची, वैज्ञानिक वेध घेणारी साधने ठेवलेली होती. मात्र, स्फोटामुळे सबंध मनोऱ्याची वाफ झाली आणि स्फोटाबाबतची नोंद करणारी बहुतेक सर्व सामुग्रीही हवेत विरून गेली. स्फोटाने ८०० यार्ड परिघातील वाळवंटाचा पृष्ठभाग

बेचिराख केला. वाळू वितळवून, कठीण, ठिसूळ आणि काचेगत दिसणाऱ्या आणि वाटणाऱ्या हिरव्या पदार्थात गोठवून टाकली. ह्या भूभागापलीकडे, मनोरा होता त्या ठिकाणापासून १०,००० यार्डांवर, अमेरिकन शासनातील संबंधित उच्चपदस्थ, लष्करी अधिकारीवर्ग आणि वैज्ञानिक, खंदकांमधून स्फोटाचे निरीक्षण करत होते. त्यांनी संरक्षक चष्मे घातलेले होते. पण प्रकाशाची दिप्ती एवढी तीव्र होती की, त्यांना तरीही डोळे झाकून घ्यावे लागले आणि नंतर बहिरे करणाऱ्या आवाजापासून बचावण्यासाठी हातांनी कान दाबून घट्ट बंद करावे लागले (२).

त्यानंतर ६ ऑगस्ट १९४५ रोजी जपानमधील हिरोशिमा शहरावर आणि मग ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानमधीलच नागासाकी शहरावर अणुस्फोटके टाकण्यात आली. त्याची परिणती दुसरे महायुद्ध संपुष्टात येऊन झाली.

एकविसाव्या शतकात मात्र ह्या महाकाय प्रकल्पाहूनही अतिप्रचंड असा एक प्रकल्प संकल्पित करण्यात आला. राबवला गेला. सव्वाशे कोटी लोकांच्या ओळख निश्चितीचा हा प्रकल्प म्हणजेच आपल्या देशातील 'आधार' ओळखपत्रांचा प्रकल्प. आपल्याला अत्यंत अभिमानास्पद ठरणाऱ्या ह्या सृजनशील प्रकल्पाची संकल्पना नंदन निलेकणी ह्या विद्वान उद्योजकाने मांडली. तत्कालीन काँग्रेस असो वा भाजप दोन्हीही सरकारांनी गुणवत्तेच्या आधारावर त्यास अपरिमित बळ दिले आणि आज हा प्रकल्प अतिशय गतीमानतेने घोडदौड करत आहे.

मूळ संकल्पनाकर्ते नंदन निलेकणी ह्यांनीच, ह्या प्रकल्पाचे इत्थंभूत वर्णन 'भारताचे पुनरुत्थान- अब्जावधी आकांक्षांना मूर्त स्वरूप देणे (रिबूटींग इंडिया- रिअलायझिंग अ बिलिअन ॲस्पिरेशन्स)' ह्या आपल्या ग्रंथात करून ठेवलेले आहे (३).

सरकारी कार्यक्रमात तंत्रज्ञानास शिरकाव मिळणे अवघड असते. ह्याची दहा कारणे त्यांनी लिहून ठेवलेली आहेत. ती म्हणजे :

१. सरकारी लोक अद्ययावत तंत्रविकास व त्याचे सामर्थ्य आत्मसात करू शकत नाहीत.
२. त्यांना दूरदृष्टी नसते, सातत्य नसते आणि धोका पत्करण्याची तयारीही नसते.
३. त्यांचेपाशी गुंतागुंतीच्या तंत्रशास्त्रीय प्रकल्पांच्या व्यवस्थापनाची कौशल्ये नसतात.
४. स्वयंचलनी कार्यपद्धतीमुळे भ्रष्टाचारास आणि खंडणी वसुलीस वाव राहात नाही.
५. नवे लोक येण्यामुळे आवश्यक ठरलेले कार्यपद्धतीतील बदल घडवण्यास अवरोध होतो.
६. प्रचलित प्रणाली, समन्वयाऐवजी प्रादेशिकता व प्रशासकीय उतरंडीस पसंत करते.
७. सरकारी व्यवस्थेत विदा-संकलनाची खासियत व सुरक्षा ह्यांचा गैरवापर होऊ शकतो.
८. दीर्घकालीन जनहितार्थाची व्यूहरचना संबंधितांच्या अल्पकालीन डावपेचांनी झाकोळते.
९. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' वृत्तीपायी बदलास अवरोध होतो.
१०. सत्ता टिकवण्याकरता आणि बदलांना विरोध करण्याकरता अभद्र युती होतात.

म्हणून खासगी उपक्रमांचे आधारे शून्यापासून सुरुवात करून, अब्जावधी लोकांपर्यंत पाच वर्षांच्या आत सगळ्यांना ओळखपत्र देऊन, आधार देण्याचे काम करण्याच्या उमेदीने हा प्रकल्प २०१० साली सुरू झाला. एका समारोहात गुजरात सीमेवरील महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील टेंभळी गावातील रंजना सोनावणे ह्यांना पहिले आधारपत्र देऊन ह्या प्रकल्पास सुरुवात झाली.

प्रत्येक नागरिकास स्वतःची ओळख, वेगवेगळ्या कारणांसाठी, वेगवेगळ्या प्राधिकरणांना पटवून द्यावी लागते. ह्या प्रयासात आपण किती पैसा, वेळ आणि प्रयत्न खर्ची घातले आहेत ते आपले आपल्यालाच माहीत आहे. बहुतेक सरकारांनी पारपत्र, वाहनचालन अनुज्ञप्ती, व्यक्तीगत खाते क्रमांक (पॅन), मतदारयादी ओळखपत्र, शिधावाटपपत्र, गरीबी रेषेखालील नागरिक असल्याचे प्रमाणपत्र, रोजगारहमी योजनेत सहभागी असण्याचे प्रमाणपत्र इत्यादीकरता ओळखपत्रे पुरवली. ती मिळवण्याकरता त्याच त्या नागरिकांनी, तितक्यांदा आपापली ओळख सरकारांना पटवून दिलीही. तरी पण सर्वत्र वापरता येईल अशी ओळख काही त्यांचेपाशी नव्हती. त्या ओळखपत्रांची वैधताही संशयास्पद असे. दिल्ली विमानतळावर तर पॅनकार्डला ओळखपत्र म्हणून मानतच नसत. माजी पंतप्रधान राजीव गांधी एकदा म्हणाले होते की, सरकार देत असलेल्या १०० पैसे अनुदानापैकी केवळ १५ पैसेच लक्ष्य असलेल्या व्यक्तीपर्यंत जाऊन पोहोचतात. सरकारी अनुदाने व्यक्तीपर्यंत पोहोचायची असतील तर मुळात त्या व्यक्तींना सरकारने ओळखणे गरजेचे आहे. हीही एक महत्त्वाची गरज त्यामुळे अधोरेखित झाली होती.

सर्वत्र चालेल असे, मान्यताप्राप्त वैधतेचे, व्यक्तीगत ओळख-संदर्भांशी संलग्न असलेले, आर्थिक व्यवहारांचा पत्ता म्हणून वापरले जाऊ शकेल असे. राष्ट्रीय ओळखपत्र प्रत्येक व्यक्तीस पुरवणे ही काळाची गरज झाली. सरकारने दिलेले 'आधारपत्र' हे त्या आवश्यकतेस साजेसेच उत्तर होते. त्याकरता सार्वत्रिक ओळख प्राधिकरण, भारत (युनिव्हर्सल आयडेंटिफिकेशन ऍथोरिटी ऑफ इंडिया-यू.आय.डी.ए.आय.) ह्या संस्थेची स्थापना २८ जानेवारी २००९ रोजी करण्यात आली. नंदन निलेकणींना तिचे संस्थापक अध्यक्ष करून, केंद्रीय मंत्र्याचा दर्जा देण्यात आला होता. २०१८ साली ह्या प्रकल्पाकरताची भारत सरकारची अंदाजपत्रकी तरतूद सुमारे दहा हजार कोटी रुपयांची आहे. जुलै २०१८ पर्यंत १ अब्ज २२ कोटी लोकांना आधारपत्र वितरितही करण्यात आलेले आहे (४). दोन्ही डोळ्यांची बुबुळे, हातांच्या दहाही बोटांचे ठसे, स्वाक्षरी आणि फोटो ह्या व्यक्तीगत जैवमापनांची माहिती; तसेच पत्ता, संपर्कादी व्यक्तीगत लोकसंख्यात्मक माहिती घेऊन; प्रत्येक नागरिकास त्याची ओळख म्हणून आधारचा एक बारा अंकी ओळखक्रमांक त्यास दिला जातो. ही संख्या नागरिकत्वाचे द्योतक नसली तरी त्या व्यक्तीची ओळख पटवण्यास पुरेशी ठरते. जागतिक अधिकोषाचे प्रमुख अर्थतज्ज्ञ पॉल रोमर ह्यांचेनुसार ''आधार ओळख कार्यक्रम' हा जगातील सर्वाधिक चर्चित, अद्ययावत कार्यक्रम आहे'' (४).

७ नोव्हेंबर २०१२ पासून सार्वत्रिक ओळख प्राधिकरणाने आधारधारकांसाठी निरंतर जालसंजीवित वैधता पडताळणी प्रणाली (ऑनलाईन व्हेरिफिकेशन सिस्टिम) सुरू केली. ही प्रणाली वापरून बँका, संचार पुरवठादार आणि सरकारी खातीही, ती व्यक्ती भारताची रहिवासी आहे की नाही ते पडताळून पाहू लागली.

१ मार्च २०१८ पासून आभासी ओळख (व्हर्च्युअल आयडेंटिटी) जारी करण्यात येऊ लागली. आधारपत्र वापरून तयार केलेली ही एक सोळा अंकी संख्या असते. आधारशी संबंधित कामांकरता ती वापरली जाऊ शकते.

ओळख न पटल्याने निराधार होणाऱ्यांना 'आधार'ने ओळख दिली. खोट्या ओळखीच्या आधारे वावरून अनेक लाभ पदरी पाडून घेणारे लोक ओळखले जाऊन सुमारे १५% अनुदाने वाचू लागली. यापुढे जेव्हा 'आधार'ला कायदेशीर अनिवार्यतेचे बंधन आणि आनुषंगिक कायदेशीर सुरक्षा कवच लाभेल तेव्हा आधार

(पृष्ठ क्र.३९ वर)

# ओळख वनस्पतींची
# थोरली गुंज / रतनगुंज

*'थोरली गुंज / रतनगुंज' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, झाडे म्हटली की प्रथम आठवते ते जंगल. जिकडे तिकडे झाडेच झाडे. लहान, मोठी, छोट्या रोपट्या पासून तर अजस्र पुराण वृक्षापर्यंत. त्यात विविध वेलींचाही समावेश असतो. पण सर्वच झाडे जंगलात सापडतीलच असे नाही. काही झाडे मानवी हव्यासापोटी झालेल्या कत्तलीत जंगलातून नामशेष झाली, तर काही केवळ उद्याना पुरतीच सीमित राहिली. ती कधी जंगलात रुळलीच नाहीत. अशी झाडे बहुदा बाहेरून आलेली व शोभेची झाडे म्हणून उद्यानातून लागवड झालेली अशी आहेत. रतनगुंज हे याच प्रकारातील झाड. हा वृक्ष चीन, मलायाचा मूळचा रहिवासी. खूप दिवसांपूर्वी भारतात आला. आता इथे तो छान रुळला आहे. पण उद्यानांतून व रस्त्याच्या कडेलाच त्याचे अस्तित्व जाणवले ते केवळ बीयांच्या रंगावरून. याला 'रतनगुंज' असे नाव पडले असावे. कारण गुंज ही वेल आहे. या दोन वनस्पतीत बाकी कोणतेही साम्य नाही.





रतनगुंजाचे झाड साधारण १५ मीटर पर्यंत उंच वाढणारे आहे. खोड सरळ व राखाडी रंगाचे, साल खडबडीत, फांद्या चारही बाजूंनी विस्तारलेल्या. तरीही नियमित असा आकार नाही, त्यामुळे लांबून चटकन ओळखता येत नाही. पाने संयुक्त पिच्छाकृती, २० ते ३० सें.मी. लांब. दुय्यम पर्णाक्षाच्या ४ ते ६ जोड्या. त्यामुळे या पानांना द्विपिच्छाकृती असेही म्हटले जाते. पर्णिकांची लांबी २.५ ते ३ सें.मी. व रुंदी १ सें.मी. आकार चौकोनाकृती. रंग पोपटी हिरवा, रचना एकांतरीत.

या झाडाला मार्च ते मे या महिन्यात पिवळट सोनेरी रंगाच्या फुलांचे घोस येतात. लांबी साधारण २५ सें.मी. या फुलांना मंदसा सुवास असतो. पानांच्या

दुबोळक्यात येणारी ही फुले बरेचदा पानांच्या हिरव्या पोपटी रंगात बेमालूम मिसळून गेल्यामुळे लांबून पटकन दिसत नाहीत. एका लांब दांडीवर मंजिऱ्यासारखी दिसणारी ही फुले अनेक लहान लहान फुलांनी मिळून बनलेली असतात. ती पाच पाकळ्यांची जेमतेम ५ ते ६ मि.मी. आकाराची असतात. पाकळ्यांच्या मध्यातून येणारे पुंकेसरांचे तुरे डोक्यावरच्या मुकुटामुळे सुंदरच दिसतात. परंतु अतिशय छोटा आकार व झाडांची उंची जास्त. त्यामुळे मुद्दाम फुले तोडून बघितल्याशिवाय ही बाब लक्षात येत नाही. या वेळेस झाडावर हिरव्या रंगाच्या लांब शेंगा दिसू लागतात. प्रत्येक बीच्या ठिकाणी फुगीर दिसणाऱ्या या शेंगा जून होतांना पिवळ्या होत जातात. त्यांची लांबी २१ ते २२ सें. मी. व रुंदी १.५ सें. मी. या शेंगा पूर्ण वाळल्यानंतर त्या तडकून त्यांतून ७ ते ८ मि. मि. रुंदीच्या लाल गर्द रंगाच्या बीया बाहेर पडतात. याच त्या रतनगुंज होत. रंग लालगुंजेसारखाच लाल भडक असल्यामुळे व सर्व बिया सारख्याच दिसत असल्याने याला 'रतनगुंज' किंवा 'थोरली गुंज' असे नाव मिळाले असावे. काही बिया गळून पडतात तर शेंगाच्या गुंडाळ्या सोबतच काही दिवस चिपकून असतात. शेंगा पूर्ण वाळल्यावर तडकल्यानंतर त्यांचे दोन भाग विरुद्ध बाजूंनी गोलगोल वेटोळे करतात. याच वेटोळ्यांना काही लाल गुंजा बिलगून असतात.

या लाल बियांपासून अनेक शोभेच्या वस्तू व माळा, तसेच कानातील अलंकार तयार केले जातात. चीनमध्ये या बीया प्रेमाचे प्रतीक म्हणून भेट देण्याची प्रथा आहे. या झाडाचे औषधी उपयोग बरेच आहेत. कोवळ्या पानांचा उपयोग आमांशावर उपचारासाठी केला जातो. तसेच पानांमधून मिळालेले द्रव्य जिवाणूवर नियंत्रण ठेवणारे किंवा त्यांना प्रतिकार करण्याचा गुणधर्म असणारे आहे.

या झाडाची लागवड शोभेचे झाड म्हणून होत असले तरी याची मोठ्या प्रमाणावरील लागवड यापासून मिळणारे हिरवे, नत्रयुक्त खत हे आहे. या झाडाच्या पानांपासून चांगले खत मिळू शकते. तसेच झाडांची पाने जनावरांचा चारा म्हणून उपयोगात येतो. यांच्या बीया शिजवून त्यांचा वापर खाण्यासाठी करता येतो. याच्या औषधी गुणधर्माबद्दल अधिक संशोधन सुरू असून त्यांचा प्राण्यांवर होणारा परिणाम हा समाधानकारक व उपयुक्त असल्याचे दिसून आले आहे.

या झाडाचे लाकूड लाल रंगाचे असून, काही भागात त्याला लाल चंदन असेही म्हटले जाते. यामध्ये देखील औषधी गुणधर्म आहेत. पण या झाडाचे चंदनाच्या झाडाशी काहीही साम्य नाही. ही झाडे आपल्याकडे सर्वत्र दिसत असली तरी याची शेती केल्याचे किंवा जंगलात सोशल फॉरेस्ट्री म्हणूनही मोठ्या प्रमाणात लागवड केल्याचे दिसून आले नाही.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

●●●



मधे कुंपण असले की, स्नेह चांगला टिकतो! – एस. जॉन्सन

# 'कैलासराणा शिवचंद्रमौळी'

## भाग : २

*भगवान शिवाचे माहात्म्य व बारा ज्योतिर्लिंगांविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

वेदकालीन रुद्र ह्या देवाची त्रिशुल, धनुष्य व बाण ही आयुधे होती व रुद्र ह्या आयुधांच्या मदतीने देवांसाठी घनघोर युद्ध करत असे, असे संदर्भ आपणास हिंदू धर्म ग्रंथांमध्ये आढळतात. नंतरच्या काळात पुराणांमध्ये भगवान शिवदेखील आपल्या पिनाक शिव धनुष्याच्या, त्रिशुलाच्या, पाशुपत अस्त्राच्या व महेश्वर अस्त्राच्या सहाय्याने अधर्माचा नाश करतात. तसेच अधर्म मोठ्या प्रमाणात वाढल्यावर या अस्त्रांच्या सहाय्याने प्रलय देखील आणतात असे संदर्भ आढळतात. यावरून वेदकालीन रुद्र व पुराणकालीन शिव यांचा निश्चितपणे संबंध प्रस्तापित होतो.

भगवान शिवाची योग साधनेत असणारा, अतिशय शांत वृत्तीचा व भक्तांनी साधे-भोळेपणाने मनापासून पूजा केल्यानंतर त्यांना सहजपणे पावणारा वा प्रसन्न होणारा 'भोलेनाथ' अशी देखील ख्याती आहे. भक्तगणांची अशी श्रद्धा आहे की, मनापासून आराधना केल्यावर महादेव हा भक्तांना सहजपणे पावतो व त्यांचे रक्षण करतो. तसेच, अधर्म वा गैरवर्तन केल्यावर महादेवाचा कोप होऊन तो अशा लोकांचा नाश करतो. कोणती कृत्ये ही महापाप असून भगवान शिव त्यांना क्षमा करत नाही याविषयीची माहिती काही ठिकाणी मिळते. अशी पापकृत्ये पुढीलप्रमाणे आहेत-स्त्री वा पुरुषाने परपुरुषाची वा परस्त्रिची अभिलाषा ठेवणे, दुसऱ्याच्या संपत्तीवर डोळा ठेवणे, निष्पाप व्यक्तीला लुटण्याचा प्रयत्न करून, त्यांच्या स्वप्नांचा व इच्छा आकांषांचा भंग करण्यासाठी षडयंत्र रचणे, जाणतेपणी स्वधर्म वा सत्कर्मांची साथ सोडून वाममार्ग पत्करणे, गर्भवती स्त्री विरुद्ध अपशब्दांचा वापर करणे, एखाद्या व्यक्तीचे चारित्रहनन व समाजातील मान कमी करण्यासाठी जाणूनबुजून खोटे बोलणे, खोट्या अफवांचा प्रसार करणे, तसेच एखाद्या व्यक्तीचा समाजातील मान व दर्जा कमी करण्यासाठी त्याच्या परोक्ष /अनुपस्थितीत त्याच्याविषयी वाईट बोलणे वा त्याच्यावर टीका करणे, हिंदू धर्माप्रमाणे वर्ज्य असणाऱ्या पदार्थांचे/अन्नाचे सेवन करणे, लहान मुले तसेच स्त्रिया व कुठल्याही कमकुवत प्राण्यांविरुद्ध हिंसेचा वापर करणे, इतरांची संपत्ती व परस्त्रीही वाममार्गाचा वापर करून मिळविणे, मंदिरातील वस्तू चोरी करणे; आपल्या गुरू वा शिक्षकांचा, संन्याशांचा, आई-वडिलांचा व पूर्वजांचा अपमान करणे व त्यांच्यावर टीका करणे, इ. अशी कृत्ये केल्यावर भगवान शिव कोप पावतात व ही कृत्ये करणाऱ्या व्यक्तींना दंड देतात असे शिवभक्त मानतात. भगवान शिवाने माता पार्वतीसोबत संभाषण करताना पाच सत्कृत्ये व सद्‌गुण कोणते आहेत हे सांगितले होते असे शैव पंथीय मानतात. ही कृत्ये वा सद्‌गुण पुढील प्रमाणे आहेत - नेहमी सत्य वचन बोलावे म्हणजेच खरे बोलावे व चांगल्या व्यक्तीला त्रास होईल असे कृत्य करू नये, व्यक्तीने आपल्या कृतींचे आत्मपरीक्षण करावे व नेहमी स्वतःस वाईट कृत्य करण्यापासून परावृत्त करावे; व्यक्तीच्या बोलण्यात (वाणीत), कृत्यांमध्ये तसेच विचारांमध्ये वा मनातदेखील पाप येऊ देऊ नये, व्यक्तीने मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे याची स्वतःमध्ये जाणीव निर्माण करणे व भौतिक सुखांच्या मागे अनाठाईपणे

गरज ही कोणताही कायदा मानत नाही. - ऑलिव्हर क्रॉमवेल

लागण्याऐवजी ध्यानधारणा घेणे; वाईट कृत्यांसाठी प्रायश्चित्य करणे. या सर्व विवेचनावरून भगवान शिवाशी निगडित तत्त्वज्ञान व्यक्तीचे जीवन समृद्ध करण्यासाठी किती उपयोगी आहे हे जाणवते.

आपण पाहिलेलेच आहे की, हिंदू धर्मियांची अशी निस्सीम श्रद्धा आहे की, भारतामध्ये एकूण बारा ज्योतिर्लिंगे असून ती अतिशय पवित्र आहेत. हिंदू भाविक ह्या बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा करत असतात. किंबहुना आयुष्यात एकदा तरी ह्या पवित्र बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा करावी अशी त्यांची इच्छा असते.

आपण अगोदर उल्लेख केलेले सोमनाथचे (गुजरात) ज्योतिर्लिंग हे मूळ बारा ज्योतिर्लिंगापैकी एक मानले जाते. ह्या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी जगभरातून लोक येत असतात. सोमनाथ मंदिरावर अनेक परकियांनी आक्रमण केलेले आढळते. यात मुस्लीम आक्रमकांसोबतच पोर्तुगिजांचादेखील समावेश आहे. गझनीच्या महमूदाने देखील ह्या मंदिरावर आक्रमण केले होते. असे म्हटले जाते की , महमूद गझनीने सोमनाथ मंदिरातून वीस (२०) दशलक्ष दिनार (बऱ्याचशा अरबी देशांतील चलन) एवढी लूट केली होती. सध्याच्या सोमनाथ शिवमंदिराचा जिर्णोद्धार होऊन ते चालुक्य स्थापत्यशास्त्राच्या धर्तीवर बांधलेले आहे व ह्या मंदिराचे बांधकाम वा जिर्णोद्धार १९५१ साली झालेला असून ते करण्याचे श्रेय स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना जाते. आपण येथे नमूद केलेले चालुक्य म्हणजे इसवी सनाच्या १० व्या शतकापासून ते इसवी सनाच्या १३ व्या शतकापर्यंत गुजरात व राजस्थानच्या काही भागांवर राज्य करणारे चालुक्य घराणे होय. असो.

श्री शैलम् येथील मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग व शिवमंदिर आंध्र प्रदेशातील कुर्नुल जिल्ह्यात आहेत. ह्या जिल्ह्याच्या उत्तरेस तेलंगणा राज्यातील मेहबूब नगर जिल्हा, वायव्येला कर्नाटकातील रायचूर जिल्हा, पश्चिमेला कर्नाटकातील बळ्ळारी जिल्हा तर दक्षिणेला हैदराबाद आहे. कुर्नुल जिल्ह्यातून कृष्णा नदी वाहात पुढे जाते. कुर्नुल जिल्ह्यातील श्रीशैलम् येथे कृष्णा नदीच्या उजव्या बाजूच्या तीरावरील नल्लामलाई टेकड्यांच्या पठारावर मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग असलेले शिव मंदिर आहे. प्राचीन काळापासून हिंदू भाविक ह्या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी सर्व भारतातून जात असतात. येथील टेकडीला वा डोंगराला सिरिधन, श्रीगिरी, श्रीपर्वत तसेच श्रीनागम् असेदेखील म्हटले जाते. ह्या मंदिरात दरवर्षी महाशिवरात्री व नवरात्रौत्सव हे उत्सव वा सण साजरे केले जातात. मल्लिकार्जुन येथील ज्योतिर्लिंग व येथील भगवान शिवाच्या वासाविषयी एक कथा सांगितली जाते व ही कथा अशी की, भगवान शिव व पार्वतीने एकदा गणेश (गणपती) व कार्तिकेय ह्या आपल्या दोन पुत्रांचा विवाह करण्याचे ठरविले. त्यावेळी ह्या दोघांपैकी प्रथम कुणाचा विवाह व्हावा यावरून प्रश्न पडला. तेव्हा असे ठरविण्यात आले की, गणेश व कार्तिकेय यांच्यापैकी जो कोणी विश्वाला वेढा घालून वा विश्वभ्रमण करून भगवान शिव व पार्वतीमातेकडे कैलासावर पहिल्यांदा परत येईल त्याचाच विवाह प्रथम होईल. त्यानुसार कार्तिकेय आपले वाहन मोरावर आरूढ झाला व तो विश्वभ्रमण करण्यासाठी निघाला. कार्तिकेय अशातऱ्हेने निघून गेल्यावर गणेशाने आपल्या बुद्धीचा वापर करून एक युक्ती लढवली. त्याने भगवान शिव व पार्वती, म्हणजेच आपले माता-पिता हेच आपले खरे विश्व होय असे मानून शिव-पार्वतीला सात वेढे घातले. असे म्हटले जाते की, शास्त्रांप्रमाणे आपल्या माता-पित्यांच्या भोवती सात वेळा प्रदक्षिणा केल्यावर विश्वभ्रमण वा विश्वाची प्रदक्षिणा केल्यासारखेच असते. गणेशाची ही बुद्धिमत्ता पाहून भगवान शिव व माता पार्वती प्रसन्न झाले व त्यांनी

माणूस कितीही मूर्ख असला, तरी गरज त्याला शहाणपण शिकवते. - युरीपाईड

गणेशाचा बुद्धी (बुद्धीमत्ता), सिद्धी (आध्यात्मिक शक्ती) व रिद्धी (समृद्धी) यांच्यासोबत विवाह लावून दिला. यानंतर कार्तिकेय विश्वभ्रमण करून कैलासावर शिव व पार्वतीसमोर हजर झाला. परंतु त्याच्या असे लक्षात आले की, शिव व पार्वतीने गणेशानी त्यांना घातलेल्या सात प्रदक्षिणा म्हणजेच विश्वभ्रमण असे मान्य करून त्याचा विवाह कार्तिकेय येण्यापूर्वीच लावून दिला आहे. त्यामुळे कार्तिकेय आपल्या माता-पित्यावर नाराज झाला व त्याने कैलास सोडून जाण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्याने 'कुमार ब्रह्मचारी हे नाव धारण करून तो क्रौंज पर्वतावर निघून गेला. शिव व पार्वती कार्तिकेयाची समजूत घालण्यासाठी तेथे आले तेव्हा कार्तिकेय तेथून देखील दुसरीकडे निघून जाण्यासाठी निघाला तेव्हा देवांनी त्याची समजूत घातली. त्यामुळे त्याने तेथेच जवळपास राहण्याचे मान्य केले व तेथे ज्या ठिकाणी भगवान शिव व माता पार्वती राहिले ते ठिकाण 'श्रीशैलम्' म्हणून प्रसिद्ध झाले. येथील मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग असलेले मंदिर हे सर्वात जुने असून ते इसवी सनाच्या सातव्या शतकात बांधलेले असावे असे अभ्यासकांचे मत आहे. भाविक असे देखील मानतात की, येथील सहस्र (हजार) लिंगांची स्थापना रामाने तर त्याव्यतिरिक्त पाच लिंगांची स्थापना पांडवांनी केलेली आहे. श्रीशैलम् येथे अठरा महाशक्तीपीठांपैकी एक शक्तीपीठ आहे. शिव पुराणातील कथेनुसार जेव्हा 'सती' मातेने आपला पिता दक्ष याने आयोजित केलेल्या यज्ञकुंडात स्वतःचा त्याग केला तेव्हा भगवान शिव सतीच्या वियोगाने व्याकूळ झाले व ते सतीचा देह घेऊन सर्वत्र भ्रमण करू लागले. भगवान शिवाची ही स्थिती पाहून ब्रह्मा, विष्णू व इतर देवांनादेखील चिंता वाटू लागली. भगवान शिव, सती मातेच्या वियोगाने तिचे शव घेऊन असे फिरत राहिले तर सृष्टी व विश्वातील विविध क्रिया बंद पडून त्यांचा नाश होईल असे त्यांना वाटू लागले. कारण सृष्टी व विश्वाच्या नियमनामध्ये महादेवाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अशावेळी भगवान विष्णूने शिवाला सतीमातेच्या शोकातून बाहेर काढण्यासाठी आपल्या सुदर्शन चक्राच्या सहाय्याने तिच्या मृत देहाचे / शवाचे तुकडे करण्याचे ठरविले व त्यानुसार भगवान विष्णूने सुदर्शन चक्राचा वापर करून सती मातेच्या शरीराचे तुकडे केले व सतीमातेच्या पवित्र देहाचे तुकडे पृथ्वीवर ज्या-ज्या ठिकाणी पडले तेथे शक्तीपीठे निर्माण झाली असे हिंदू मानतात. अशी एकूण अठरा महाशक्तीपीठे असल्याची मान्यता आहे. असे म्हटले जाते की, एकूण शक्तीपीठांची संख्या एकावन्न ते एकशे आठ एवढी असून यापैकी अठरा ही महाशक्तीपीठे आहेत. ही अठरा महाशक्तीपीठे पुढीलप्रमाणे आहेत - श्रीलंकेतील त्रिनकोमली (शंकरी देवी), तामीळनाडूतील कांची (कामाक्षी देवी), पश्चिम बंगालमधील प्रद्युम्न (श्री श्रृंखला देवी), कर्नाटकातील म्हैसूर (चामुंडेश्वरी देवी), आंध्र प्रदेशातील आलमपूर (जोगूलंबा देवी), आंध्र प्रदेशातील श्रीशैलम् (भ्रमरंभा देवी), महाराष्ट्रातील कोल्हापूर (महालक्ष्मी देवी), महाराष्ट्रातील नांदेड-माहूर (एकविरा देवी), मध्य प्रदेशातील उज्जैन (महाकाली देवी), आंध्रप्रदेशमधील पीठापुरम् (पुरुहुतिका देवी), ओडिशातील जाजपूर (बिराज देवी), आंध्र प्रदेशातील द्राक्षरामम् (मानिक्यम्ब् देवी), आसाममधील गुवाहटी (कामरूप देवी), उत्तर प्रदेश-प्रयाग (माधवेश्वरी देवी), हिमाचल प्रदेश-ज्वाला (वैष्णवी देवी), बिहार-गया (सर्वमंगल देवी), उत्तर प्रदेश-वाराणसी (विशलक्षी देवी), छत्तीसगढ-दंतेवाडा (दंतेश्वरी देवी), काश्मीर (सरस्वती देवी). यातील एक महाशक्तीपीठ श्रीलंकेत असल्याने भारतातील महाशक्ती पीठांची संख्या अठरा ठरते. असो. तर आपला मुद्दा असा होता की, श्रीशैलम् हे ठिकाण हिंदूसाठी व प्रामुख्याने शैवपंथीयांसाठी फार महत्त्वाचे ठरते. कारण येथे फक्त बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग तर आहेच, परंतु एक महाशक्तीपीठ देखील आहे.

---

गरजेला नीट व्यवहार जमत नाही. - बेंजामिन फ्रँकलीन

आपण नमूद केलेल्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी अजून एक महत्त्वाचे ज्योतिर्लिंग म्हणजे उज्जैन येथील 'महाकालेश्वर' हे होय. उज्जैन हे मध्य प्रदेशातील माळवा विभागातील क्षिप्रा (शिप्रा) नदीच्या पूर्व तीरावर वसलेले एक प्राचीन शहर आहे. क्षिप्रा ही नदी भारत वर्षातील एक पवित्र नदी मानली जाते. क्षिप्रेच्या तीरावर दर बारा वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा भरत असतो. 'क्षिप्रा' याचा अर्थ पवित्रता, शुद्धता तसेच निर्मळपणा असा होतो असे तज्ज्ञांचे मत आहे. क्षिप्रा नदीचा उगम मध्य प्रदेशातील धार जिल्ह्याच्या उत्तरेला विंध्य पर्वत रांगांच्या भागात होतो व ती पुढे चंबळ नदीला जाऊन मिळते. क्षिप्रा नदीच्या उगमाविषयी एक कथा सांगितली जाते. ही कथा अशी की, एकदा भगवान शिव हातात ब्रह्मदेवाची कवटी घेऊन भिक्षा मागत हिंडत होते परंतु त्यांना तिन्ही जगात अर्थात स्वर्ग, पृथ्वी व पाताळात कुठेच भिक्षा मिळाली नाही. त्यामुळे ते शेवटी वैकुंठात भगवान विष्णूकडे गेले. हिंदूंची अशी श्रद्धा आहे की, भगवान विष्णू लक्ष्मीसह वैकुंठात वास करतात. असे म्हटले जाते की, सत्यलोकाच्या २६,२००,००० योजनेवर वैकुंठ आहे. येथे एक गोष्ट नमूद करणे महत्त्वाचे आहे व ती ही की, सत्यलोकात सृष्टीचा रचेता ब्रह्मदेव वास करत असतो अशी मान्यता आहे. असे म्हटले जाते की, वैदिक काळात 'योजनेत' अंतर मोजले जात असे. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, भगवान शिव वैकुंठ लोकात भगवान विष्णूकडे भिक्षा मागण्यासाठी गेले. तेव्हा भगवान विष्णूने त्यांना आपली तर्जनी दाखविली. त्यामुळे भगवान शिव क्रोधीत झाले व त्यांनी आपल्या त्रिशुलाने भगवान विष्णूची तर्जनी कापून टाकली व त्यामुळे भगवान विष्णूच्या कापलेल्या बोटातून रक्त गळू लागले व ते रक्त भगवान शिवाच्या हातातील ब्रह्मदेवाच्या कवटीरुपी भिक्षापात्रात पडू लागले शेवटी भिक्षापात्र रक्ताने भरून ते रक्त भिक्षापात्राच्या बाहेर पडू लागले व त्याची धार होऊन ती पृथ्वीवर पडली. हे भगवान विष्णूचे पृथ्वीवर पडलेले रक्त म्हणजेच क्षिप्रेचा प्रवाह वा क्षिप्रा नदी होय असे अनेक हिंदू मानतात. काही पुराणांमध्ये क्षिप्रा नदीचा उगम विष्णूच्या वराह अवतारापासून म्हणजेच वराहाच्या हृदयातून झाला असे संदर्भ आले असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. हिंदू असे मानतात की, ह्या क्षिप्रा नदीच्या तीरावरच सांदिपनी ऋषींचा आश्रम होता. सांदिपनी ऋषी हे कृष्ण व बलरामाचे गुरू होत. असो. तर मुद्दा असा आहे की, उज्जैन हे शहर हिंदू धर्मियांसाठी फारच महत्त्वाचे आहे. शैव, वैष्णव व शाक्त ह्या हिंदू धर्मातील तीन महत्त्वाच्या पंथांतील लोक उज्जैनला फार पवित्र मानतात. महाकालेश्वराच्या मंदिरात कुठल्याही शिवमंदिराप्रमाणे महाशिवरात्रीचा उत्सव अतिशय उत्साहात साजरा केला जातो. महाकालेश्वर हे अठरा महाशक्तीपीठांपैकी एक शक्तीपीठ होय. अशीही एक कथा सांगितली जाते की, येथेच भगवान शिवाने व महाकाली मातेने अंधकासूर या आसूराचा वध केला होता. अंधकासुराला असे वरदान प्राप्त होते की, त्याच्या प्रत्येक रक्ताच्या थेंबातून तो नव्याने जन्म घेईल. म्हणजेच एका अर्थाने त्याला अमरत्वाचे वरदान होते. त्यामुळे देवांच्या विनंतीवरून महादेवाने अंधकासुराचा नाश वा वध करण्याचे मान्य केले. यानुसार गणेशाने (विनायक) अंधकासुराला जखडून ठेवले. भगवान शिवाने आपल्या त्रिशुलाने अंधकासुराच्या छातीचा छेद केला वा त्रिशूल त्याच्या छातीत रोवले. त्यानंतर अंधकासुराचे जे रक्त सांडले त्यातून अनेक अंधकासूर उत्पन्न झाले. तेव्हा महाकाली माता आपल्या मातृकांसोबत अवतरली. येथे एक गोष्ट नमूद करावी लागेल व ती म्हणजे हिंदू धर्मामध्ये मातृदेवांच्या गटाला 'मातृका' असे म्हणतात. या मातृकांना पार्वती मातेची विविध रूपे असल्याचे मानले जाते. या मातृकांचा संबंध भगवान शिव व पार्वतीचा पुत्र असलेला कार्तिकेय म्हणजेच स्कंद याच्याशीही जोडला जातो. मातृकांना 'स्कंदाच्या दत्तक माता' असेदेखील मानले जाते. स्कंद

वा कुमार कार्तिकेय यास एक शूरवीर योद्धा व देवांचा सेनापती मानले जाते. स्कंद व मातृका ह्यांच्या संबंधीच्या अनेक कथा महाभारतात आलेल्या आहेत. असेही म्हटले जाते की, मातृकांचा जन्म वा उत्पत्ती इंद्राच्या वज्राचा स्कंदाच्या शरीरावर आघात झाल्यामुळे त्याच्या शरीरातून झाली. महाभारतातील ह्या कथेत सप्त मातृकांची नावे पुढील प्रमाणे दिलेली आहेत – काकी, हलिमा, बृहती, आर्या, मालिनी, मलामा व वैमित्रा दक्षिण भारतात सप्तमातृका तर नेपालमध्ये अष्टमातृका पुजल्या जातात. मातृकांची एकूण संख्या सात असते अशी धारणा आहे. काही स्तोत्रांतून आपणास मातृकांची संख्या आठ असल्याची माहिती मिळते. ह्या अष्टमातृकांची नावे पुढील प्रमाणे आहेत– ब्रह्मी, वैष्णवी, माहेश्वरी, ऐन्द्री (हिलाच इंद्राणी देखील म्हणतात) कौमारी, वाराही, चामुण्डा, नारसिंहीं. अगोदर नमूद केल्याप्रमाणे महाभारतातील एका कथेनुसार ह्या सप्तमातृका म्हणजे स्कंदाच्या माता होत. सप्तमातृकांविषयी अजूनही अनेक कथा आहेत. असो. तर आपला मुद्दा असा होता की, अंधकासुराचा वध करण्यासाठी महाकाली माता सप्तमातृकांसोबत अवतरली व तिने अंधकासुराचे सर्व रक्त प्राशन केले व नव्याने निर्माण झालेल्या सर्व अंधकासुरांना खाऊन टाकले वा गिळंगृत केले. त्यानंतर भगवान शिवाने अंधकासुराला अवकाशात वर अधांतरी उचलले व आपले तृतीय नेत्र उघडून त्याचा अंत केला. तद्नंतर अंधकासुराने आपला पराभव मान्य केला व त्याने भगवान शिवाची आराधना केली. त्यामुळे भगवान शिवाने व माता पार्वतीने तो शिवाचा एक गण बनेल असे त्याला वरदान दिले व पूर्वाश्रमीचा अंधकासुर ह्यानंतर महादेवाचा गण बनला व भृगी ह्या नावाने प्रसिद्ध पावला. अशातऱ्हेने, उज्जैन मधील महाकालेश्वर मंदिर वा ठिकाण शैव पंथीयांसाठी फार महत्त्वाचे ठरते. कारण येथे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग व अठरा महाशक्ती पीठांपैकी एक शक्तीपीठ तर आहेच परंतु या ठिकाणासोबत अंधकासुराची आख्यायिका वा कथा जोडली गेली आहे.

ओंकारेश्वर हे ज्योतिर्लिंग मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यात नर्मदा नदीमध्ये असलेल्या एका बेटावर आहे. ओंकारेश्वराबाबतच्या देखील अनेक कथा सांगितल्या जातात. एका कथेनुसार विंध्याचल पर्वताने एकेकाळी महादेवाची आराधना केली. त्यामुळे भगवान शिव प्रसन्न होऊन ते विंध्याचलासमोर ओंकारेश्वर व अंमलेश्वर ह्या रुपांत प्रकट झाले. ओंकारेश्वरला पार्वती माता तसेच गणपतीचे मंदिर आहे. ओंकारेश्वर ज्योतिर्लिंगाबाबतची अजून एक कथा सांगितली जाते. ही कथा अशी की, इक्ष्वाकू कुळातील एका राजाचे नाव मांधाता असे होते. मांधाता राजाने महादेवाची आराधना केली (इक्ष्वाकू) हा वैवस्वत या मनुच्या दहा पुत्रांपैकी एक पुत्र होता व तो इक्ष्वाकू कुळातील पहिला राजा होता. इक्ष्वाकू कुळामध्येच भगवान विष्णूचा एक अवतार असलेल्या श्रीरामाचा जन्म झाला होता व इक्ष्वाकू हे कुल सूर्यवंशी होते.) मांधाता हा इक्ष्वाकू कुळातील राजा युवांक्ष याचा पुत्र होता. पुराणांनुसार मांधाता राजाला तीन पुत्र होते व त्यांची नावे पुरुकुत्स, अंबरीश व मुचुकुंद अशी होती. तर ह्या मांधात राजाने आपल्या अंबरीश व मुचुकुंद पुत्रांसह महादेवाची आराधना केली. त्यामुळे ओंकारेश्वर येथे भगवान शिव हे ज्योतिर्लिंग रुपाने प्रकट झाले. अजून एक कथा असे सांगते की, एकदा देव व दानवांचा संघर्ष सुरू झाला व त्यात दानवांनी देवांचा पराभव केला. त्यामुळे देवांनी महादेवाची आराधना केली व भगवान शिव ओंकारेश्वर येथे ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात प्रकट झाले व त्यांनी दानवांचा संहार केला.

केदारनाथ वा केदारेश्वर हे ज्योतिर्लिंग गढ़वाल हिमालयातील केदारनाथ येथे आहे. हे ठिकाण उत्तराखंड ह्या राज्यातील रुद्रप्रयाग ह्या जिल्ह्यात आहे. केदारनाथ हिमालयातील चार धामांपैकी (केदारनाथ, बद्रीनाथ,

गंगोत्री व यमुनोत्री) सर्वात लांबचा व खडतर प्रवास करावा लागणारे पवित्र धाम आहे असे भक्तगण म्हणतात. केदारनाथ हे हिमालयातील पवित्रस्थळ समुद्र सपाटीपासून ३५८६ मीटर एवढे उंच आहे. केदारनाथ हे हिमालयात उगम पावणाऱ्या व रुद्रप्रयाग येथे अलकनंदा नदीला जाऊन मिळणाऱ्या मंदाकिनी ह्या नदीच्या जवळ आहे. येथे हिवाळा अतिशय कडक असल्यामुळे केदारनाथ मंदिर एप्रिल महिन्यातल्या अखेरीपासून ते नोव्हेंबर महिन्यापर्यंतच (अक्षय्यतृतीया ते कार्तिक पौर्णिमा) भक्तांसाठी खुले असते. हिवाळ्यामध्ये केदारनाथ मंदिरातील देवतांच्या मूर्ती उखीमठ येथे आणून संपूर्ण हिवाळाभर तेथे त्यांची पूजा केली जाते. हिवाळा संपल्यानंतर पुन्हा एकदा ह्या मूर्ती केदारनाथ मंदिरात आणल्या जातात. असे म्हटले जाते की, केदारनाथ येथील मंदिर पांडवांनी बांधले होते. केदारनाथ विषयीची अजून एक कथा अशी की, महाभारताचे युद्ध संपल्यानंतर महर्षी व्यासांनी पांडवांना त्यांनी त्यांच्या भावांच्या व आप्तेष्टांच्या केलेल्या संहारातून पापमुक्त होण्यासाठी त्यांना भगवान शिवाचे दर्शन घेण्यास सांगितले. परंतु भगवान शिवाला त्यांना भेटावयाचे नव्हते. त्यामुळे भगवान शिवाने वृषभाचे रूप घेतले व ते केदारनाथ येथे गुराढोरांमध्ये लपून राहिले. मात्र पांडवांनी महादेवाला ओळखले. तेव्हा वृषभरुपी महादेवाने आपले मुख जमिनीत घालून लुप्त होण्याचा प्रयत्न केला. मात्र पांडवांनी त्याचे शेपूट धरून त्याला बाहेर ओढले व त्याला क्षमा करण्याची विनंती केली व तेथे त्यांनी केदारनाथ मंदिराची स्थापना केली. त्यानंतर वृषभरुपी शिवाच्या शरीराचे विविध भाग अन्य चार ठिकाणी प्रकट झाले व ही ठिकाणे म्हणजे तुंगनाथ, रुद्रनाथ, मध्यमहेश्वर व कल्पेश्वर ही होत. केदारनाथसह ह्या चार ठिकाणांना 'पंच केदार' असे म्हटले जाते. ह्या वृषभरुपी शिवाचे मुख वा शिर नेपाळची राजधानी काठमांडू येथे बागमती नदीच्या तिरावर प्रकट झाले व तेथे जगप्रसिद्ध असे महादेवाचे पशूपतीनाथ हे मंदिर आहे. पशूपतीनाथ मंदिरातील पूजाअर्चा करणारे पुरोहित वा याचक हे भारतातील कर्नाटक राज्यातील वेदांत पारंगत असलेले विद्वान भट ब्राह्मण आहेत. दुर्दैवाने २०१३ साली ढगफुटीमुळे उत्तराखंडात जेव्हा अतिवृष्टी झाली व त्यामुळे जो पूर आला तेव्हा केदारनाथ मंदिराच्या अगदी जवळपासच्या परिसरात खूप मोठ्या प्रमाणात पडझड झाली होती. आपणास केदारनाथ संबंधीचे उल्लेख स्कंद पुराणात देखील आढळतात.

भीमाशंकराचे मंदिर वा भीमाशंकर हे ज्योतिर्लिंग पुण्यातील पूर्वीच्या खेड व सध्याच्या राजगुरुनगर ह्या तालुक्याच्या ठिकाणापासून वायव्येकडे ५० किलोमीटर एवढ्या अंतरावर स्थित आहे. भीमाशंकर हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगांमध्ये असून येथेच पश्चिम महाराष्ट्रातून वाहणाऱ्या भीमा ह्या एका महत्त्वाच्या नदीचा उगम आहे. भीमा नदी पंढरपूर येथे चंद्रभागा या नावाने ओळखली जाते व येथेच महाराष्ट्राचे दैवत विठोबा वा विठू माउलीचे मंदिर चंद्रभागेच्या तीरावर आहे. भीमा नदी पुढे उत्तर कर्नाटकातील रायचूर ह्या जिल्ह्यात कृष्णा नदीला जाऊन मिळते. कृष्णा नदीचा उगम महाराष्ट्रातीलच सातारा जिल्ह्यातील सह्याद्री पर्वतांतील महाबळेश्वर येथे होतो व महाबळेश्वर देखील भगवान शिवाशीच निगडित एक स्थान आहे. असो. भीमाशंकर येथील ज्योतिर्लिंगाबाबतची कथा अशी आहे की, सह्याद्रीच्या पर्वत रांगांतील डाकिणी वनात भीमा नामक दुष्ट आसूर आपली आई कारकती हिच्यासोबत राहत असे. दैवी व मर्त्य शक्तींना त्याची फार भीती वाटत असे. ह्या भीमा नामक आसूराच्या मनात स्वतःच्या एकंदरीतच अस्तित्वाविषयी अनेक प्रश्न होते. याचा त्याला खूप त्रास होत असे. त्यामुळे त्याने आपल्या मातेला त्याच्या जीवनाविषयी (जन्माविषयी) व आपल्या पित्याविषयी विचारले तेव्हा कारकतीने त्याला सांगितले की, तो लंकेचा राजा रावण याचा लहान भाऊ

---

जे जे म्हणून अनैसर्गिक असते ते अपूर्णच असते. - नेपोलिअन

कुंभकर्णाचा पुत्र आहे. तसेच तिने भीमासुराला सांगितले की, रावण व कुंभकर्ण ह्या दोहोंचा वध भगवान विष्णूचा अवतार असलेल्या श्रीरामाने केला. हे ऐकल्यावर भीमासूर क्रोधीत झाला व त्याने याचा सूड घेण्याचा निश्चय केला. त्यामुळेच तो ब्रह्मदेवाकडून वरप्राप्ती करून घेण्यासाठी ब्रह्मदेवाची आराधना व तप करू लागला. भीमासुराच्या खडतर तपामुळे वा तपश्चर्येमुळे कनवाळू ब्रह्मदेव प्रसन्न झाला व त्याने भीमासुराला प्रचंड शक्ती व बळ प्राप्त होण्याचा वर दिला. ही विधात्याची चूक होती. कारण भीमासुराने ब्रह्मदेवाने दिलेल्या ह्या वराचा दुरुपयोग करून तिन्ही जगतांमध्ये हाहाकार उडवून दिला. एवढेच नव्हे तर, त्याने देवेंद्राचा म्हणजेच देवांचा राजा इंद्राचादेखील पराभव केला व स्वर्गावर आपले अधिपत्य प्रस्थापित केले. त्याने भगवान शिवाचा निस्सीम भक्त कामरुपेश्वर याचादेखील पराभव केला व त्याला अंधार कोठडीमध्ये डांबून ठेवले. भीमासूर एवढेच करून थांबला नाही तर त्याने ऋषीमुनींचा देखील छळ चालवला. त्यामुळे सर्व देव ब्रह्मदेवासोबत भगवान शिवाकडे गेले व त्यांनी भगवान शिवाला भीमासुराचा विनाश करण्याची विनंती केली. महादेवाने देवांची ही प्रार्थना ऐकली व भीमासुराचा अंत करण्याचे मान्य केले. इकडे भीमासुराचे अन्याय व अत्याचार चालूच होते. भीमासुराने कामरुपेश्वराला सांगितले की, त्याने भगवान शिवाची आराधना व पूजा करणे सोडून देऊन भीमासुराची पूजा करावी. मात्र, कामरुपेश्वराने भीमासुराकडे दुर्लक्ष करून भगवान शिवाची ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात पूजा करण्यास सुरुवात केली. तेव्हा भीमासुराने क्रोधीत होऊन शिवलिंगावर ते नष्ट करण्याच्या हेतूने शस्त्र उगारले. तेव्हा तेथे साक्षात भगवान शिव प्रकट झाले व भीमासूर व भगवान शिव यांच्यात तुंबळ युद्धाला सुरुवात झाली. शेवटी महर्षी नारदांनी महादेवाला भीमासुराचा कायमचा अंत करण्याची विनंती केली व भगवान शिवाने भीमासुराला भस्म करून टाकले. भीमासुराचा अशातऱ्हेने भगवान शिवाने नाश केल्याने सर्व देव व ऋषीमुनी हर्षभरीत झाले व त्यांनी भगवान शिवाला जेथे भीमासुराचा अंत झाला तेथे कायमस्वरूपी वास करण्याची विनंती केली. भगवान शिवाने ही विनंती मान्य करून तेथे ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात राहण्याचे मान्य केले व हे ज्योतिर्लिंग भीमाशंकर ह्या नावाने प्रसिद्ध झाले. भीमाशंकर ह्या ज्योतिर्लिंगाबाबतची ही एक कथा आपणास भाविकांकडून ऐकायला मिळते. भीमासूर व भगवान शिव यांच्यात जे युद्ध चालू होते त्यामुळे भगवान शिवाला जो घाम आला त्या घामाच्या धारांतून भीमा नदीचा उगम झाला असेदेखील भक्त लोक मानतात. अजून एका कथेनुसार हे ठिकाण भगवान शिव व त्रिपूरासूरांशी देखील संबंधित आहे. शिव महापुराणात त्रिपुरासुरांविषयी आलेली कथा पुढीलप्रमाणे आहे. तारकासुर या आसुराने देवांना खूप त्रास दिला होता व त्याचा वध भगवान शिवाच्या पुत्राकडूनच होईल असे त्याला वरदान प्राप्त होते. त्यामुळे भगवान शिव व माता पार्वतीचा पुत्र कुमार कार्तिकेय तारकासुराचा वध करतो अशी कथा शिवपुराणात आहे. ह्या तारकासुराला विद्युन्मली, तारकाक्ष व कामलक्ष असे तीन पुत्र होते. ह्या तिघांनी आपला पिता तारकासुर याचा कार्तिकेयाच्या हातून वध झाल्यावर ब्रह्मदेवाची तपस्या करण्यास सुरुवात केली. यापैकी तारकाक्ष हा सर्वात मोठा, तारकाक्षाहून लहान विद्युन्मली व सर्वात लहान कामलक्ष होता. ह्या तीन बंधुंच्या खडतर तपश्चर्येमुळे ब्रह्मदेव प्रसन्न झाला व त्याने त्यांना वर मागण्यास सांगितले. काही ठिकाणी तारकासुराच्या तिसऱ्या पुत्राचे नाव वीर्यवण होते असे उल्लेख आलेले आहेत. ह्या तीन आसुरांच्या तपश्चर्येमुळे ब्रह्मदेव प्रसन्न झाला व त्याने त्यांना वर मागण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी ब्रह्मदेवाला असा वर मागितला की, ब्रह्मदेवाने प्रत्येक आसुराला तीन अभेदय व अजिंक्य अशा असलेल्या नगरी द्याव्यात. ह्या तीन भावांच्या नगरी अजिंक्य तर असाव्यातच; सोबतच तेथे खूप मोठ्या प्रमाणात धनसंपत्ती व वैभव असावे अशा प्रकारचा

पुरुषांच्या बाबतीत मुख हे आत्म्याचे द्वार असते, तर स्त्रियांच्या बाबतीत ते अंतःकरणाचे दार असते. – ॲम्बरोझ बायर्स

वर त्यांनी ब्रह्मदेवाकडे मागितला. त्यानुसार ब्रह्मदेवाने माया नामक राक्षसाला / दानवाला तीन नगरी बनविण्यास सांगितल्या. या तीन नगरी अनुक्रमे सोने, चांदी व लोखंडाच्या होत्या. यापैकी सोन्याची नगरी स्वर्गात, चांदीची नगरी पृथ्वीवर, तर लोखंडाची नगरी पातळात होती. तारकाक्षला सोन्याची नगरी मिळाली, वीर्यवणाला चांदीची नगरी मिळाली तर विद्युन्मलीला लोखंडाची नगरी मिळाली. या तीन आसुरांनी ब्रह्मदेवाकडे असाही वर देण्याची मागणी केली की, दर हजार वर्षांनी ही तीनही नगरे एकत्र येतील वा एका सरळ वा समांतर रेषेत येतील व अशा तऱ्हेने ह्या नगरींचे एकीकरण झाल्यानंतर वा त्या समांतर रेषेत आल्यावर ह्या नगरींना 'त्रिपुरा' नगरी असे म्हटले जावे व ह्या तिन्ही नगरी अशाप्रकारे एकत्र झाल्यानंतर एखाद्याने एकाच बाणाने त्यांचा छेद घेतला तरच या नगरी नष्ट होतील व तेव्हाच त्यांचा मृत्यू होईल. ब्रह्मदेवाने त्रिपुरासुरांची ही इच्छा पूर्ण केली व त्यांना त्यांच्या इच्छापूर्तीचे वरदान दिले व वर नमूद केल्याप्रमाणे माया नामक दानवाने ह्या तीन नगरी बनवून दिल्या. त्यानंतर हे तीनही आसुर आपापल्या नगरींमध्ये राहू लागले व त्यांची समृद्धी झाली. कालांतराने देवांनी ब्रह्मदेवाकडे जाऊन त्रिपुरासुरांचा व त्यांच्या नगरींचा नाश करण्यास सांगितले. परंतु ब्रह्मदेवाने आपण तसे करण्यास असमर्थ असल्याचे सांगून त्यांना भगवान शिवाकडे जाण्यास सांगितले. भगवान शिवाने देवांना सांगितले की, आसुर कुठलेही गैरवर्तन न करता अतिशय चांगल्या तऱ्हेने ह्या तीन नगरींमध्ये राहत आहेत. त्यामुळे भगवान शिव त्यांचा नाश करू शकत नाही. यानंतर सर्व देव भगवान विष्णुकडे जातात. भगवान विष्णूनेही हेच उत्तर दिले की, आसुरांच्या हातून जोपर्यंत काही पापकर्म वा अधर्म घडत नाही तोपर्यंत त्यांचा नाश होऊ शकत नाही. त्यामुळे भगवान विष्णू अरिहन नामक डोक्यावर केस नसलेली एक पुरुष निर्माण करतात व त्याला असे सांगतात की, त्याने त्रिपुरासुरांच्या नगरीत जाऊन त्यांना वेदांच्या विरोधी भाष्य करणाऱ्या धर्माची शिकवण द्यावी, जेणेकरून त्या धर्माचे श्रवण केल्यावर ते धर्मभ्रष्ट होतील व त्यामुळे त्यांचा नाश करणे वा वध करणे सुकर होईल. त्यानुसार अरिहन त्रिपुरासुरांच्या नगरीत जाऊन त्यांना ह्या नवीन व वेगळ्या धर्माची शिकवण देतो. त्यामुळे त्रिपुरासुरातील हे तीन आसुर धर्मभ्रष्ट होतात व ते वेदांचे पालन करणे थांबवतात; तसेच शिवलिंगाचे पूजन करणेदेखील बंद करतात. त्यामुळे ते धर्मभ्रष्ट होतात. तेव्हा देव पुन्हा एकदा भगवान शिवाकडे जातात व त्यांना त्रिपुरासुरांच्या धर्मबाह्य वागणुकीविषयी माहिती देतात. तेव्हा भगवान शिव ह्या त्रिपुरासुरांचा अंत करण्यास तयार होतात. त्यानुसार विश्वकर्मा एका दिव्य रथाची निर्मिती करतो, साक्षात ब्रह्मदेव त्या रथाचे सारथ्य करतो व भगवान शिव या रथावर आरूढ होऊन त्रिपुरासुरांचा अंत करण्यास निघतात. शेवटी भगवान शिव पाशुपतास्त्राच्या (बाणाच्या स्वरुपातील एक दिव्य महासंहारक अस्त्र) सहाय्याने या त्रिपुरासुरानगरींचा व या तीन आसुरांचा विनाश करतात. भगवान शिवाचे पाशुपतास्त्र हे संपूर्ण विश्वातील सर्वात जास्त महासंहारक अस्त्र होय अशी हिंदूंमध्ये मान्यता आहे. पाशुपतास्त्र हे भगवान शिव व कालीमातेचे अस्त्र होय. महाभारतात अर्जुनाकडे हे अस्त्र असल्याचे व रामायणात भगवान राम व विश्वामित्रांकडे पाशुपतास्त्र असल्याचे संदर्भ आपणास हिंदू धर्म ग्रंथामध्ये सापडतात. अर्जुनाला हे अस्त्र साक्षात भगवान शिवाने त्याच्या तपस्येमुळे प्रसन्न होऊन दिल्याची माहिती मिळते. अर्जुनाने आपला पिता इंद्राच्या सांगण्यावरून महादेवाची तपश्चर्या करून व त्यांना प्रसन्न करून घेऊन हे पाशुपतास्त्र मागून घेतले होते. येथे पाशुपतास्त्राचा उल्लेख झालेला आहेच; तर, वाचकांना भगवान शिवाच्या धनुष्याविषयी देखील माहिती देणे संयुक्तिक ठरेल. भगवान शिवाच्या धनुष्याला 'पिनाक' असे म्हटले जाते. अशी सर्वसाधारण धारणा आहे की, महादेव ह्या धनुष्याच्या सहाय्याने,

ईश्वराला सर्वत्र जाता येईना म्हणून त्याने आईची निर्मिती केली. – ज्यू म्हण

पाशुपतास्त्राचा वापर करून प्रलय आणतात व विश्वाचा नाश करतात व त्यानंतर पुन्हा एकदा नव्याने विश्व निर्मितीची प्रक्रिया सुरू होते असे हिंदू मानतात. भगवान शिवाने पिनाक धनुष्य परशुरामाला दिले व परशुरामाने ते मिथिलेचा राजा व सीता मातेचा पिता जनक यास दिले. सीता जेव्हा उपवर झाली तेव्हा जनक राजाने तिचे स्वयंवर रचले व जो कोणी भगवान शिवाचे 'पिनाक' धनुष्य उचलून त्याला बाण लावून दाखवेल त्याच्यासोबतच सीतेचा विवाह होईल अशी घोषणा केली. या स्वयंवरात भारतवर्षातील अनेक राजे सहभागी झाले होते. लंकेचा राजा रावणदेखील ह्यावेळी आला होता, मात्र त्याला शिवधनुष्य पेलवले नाही. भगवान श्रीरामाने 'पिनाक' धनुष्य उचलले (कारण श्रीराम हा साक्षात भगवान विष्णूचा अवतार होता) मात्र राम शिवधनुष्य (पिनाक) उचलत असताना ते भंग पावले. त्यामुळे माता सीतेने श्रीरामाच्या गळ्यात वरमाला घातली व जनक राजाने त्या दोहोंचा विवाह लावून दिला.

(क्रमशः)

(**स्पष्टीकरण / शुद्धीपत्रक** : ह्या लेखाच्या पहिल्या भागात पृष्ठ क्रमांक १९ वर ऋग्वेद व यजुर्वेदातील रुद्राविषयी आलेली माहिती देताना 'श्लोक' हा शब्द वापरला आहे. परंतु वाचकांनी तेथे 'श्लोक' या शब्दाऐवजी 'मंत्र' हा शब्द वाचावा कारण वेदांमध्ये 'मंत्र' वा 'ऋचा' असतात. चुकीबद्दल दिलगिरी व क्षमस्व.)

**संदर्भ :**


- इंडिया – अ सेक्रेड जॉग्रफी (इंग्रजी): डायना एल. येक. (इंग्रजी) सुधारीत आवृत्ती
- गॅझेअिअर ऑफ इंडिया – महाराष्ट्र स्टेट, ठाणे डिस्ट्रीक्ट
- भारतीय संस्कृती कोश – खंड ९ – संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक – तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर
- भक्तिकोश तृतीय खंड – भारतीय संप्रदाय विद्यावायस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर
- शिवलिंग (इंग्रजी) : एन्. के. सिंग
- सेव्हन सिक्रेटस् ऑफ शिवा : देवदत्त पट्टनायक
- शिवा टू शंकर : देवदत्त पट्टनायक
- विश्वकोश–खंड १७ : प्रमुख संपादक : विजया वाड
- असे घडले ठाणे – डॉ. दाऊद दळवी
- देवदर्शन जिल्हा ठाणे : मोरेश्वर के. कुंटे व सौ. विजया कुंटे


**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# विना सहकार नाही उद्धार (?)

*सहकार क्षेत्राच्या सत्य परीस्थितीचा आढावा घेणारा लेख - संपादक*

महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन आणि अक्षरशः रस्त्यावर ओतलेल्या दुधाच्या धारांनी सहकारी दूध संघ आणि एकूणच सहकार क्षेत्राचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सहकारी दूध संघ, सहकारी शेती-बँका यांचे स्थान महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे असले तरीही सध्याच्या परीस्थितीतील आंदोलने आणि वाढती अस्वस्थता पाहता सहकार चळवळ आणि तिची भूमिका काळाच्या कसोटीवर तपासून पाहणे उचित ठरेल.

**सहकार चळवळ : काल आणि आज**

सहकार चळवळ किंवा 'सहकार' तत्त्वाचा Cooperation हा इंग्रजीतील समानार्थी शब्द आहे. लॅटिन भाषेतील Cooperari या to work with या अर्थाच्या शब्दापासून सहकार Cooperation हा शब्द रूढ झाला. एकमेकांच्या सहकार्याने काम पार पाडणे म्हणजे सहकार. सामाजिक जीवनात विशिष्ट आर्थिक उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या व युरोपात सहकार चळवळ रूजू लागली. 'परस्पर सहकार्य' या तत्त्वावर सहकारी संस्था उभ्या राहिल्या. इंग्लंडमध्ये सहकार तत्त्वावर कापडगिरण्यांची सुरुवात करणारा उद्योजक रॉबर्ट ओवेन (१७७१-१८५८) हा सहकार चळवळीचा जनक मानला जातो. स्वतः: अत्यंत श्रीमंत-भांडवलशाही उद्योजक असूनही त्याने बालकामगारांची प्रथा मोडीत काढली. कामगार कायदे शिथिल केले व वेतनवाढीस प्रोत्साहन दिले. १८४३ साली २८ जणांच्या कापड गिरणी कामगार समूहाने रॉबर्ट ओवेन याच्या प्रेरणेतून रॉशडेल सहकारी संस्था इंग्लंड येथे स्थापन केली. सुरुवातीला कापड-गिरणी कामगारांच्यासाठी असणारी ही संस्था त्यानंतर पीठगिरण्या, पादत्राणांचा उद्योग व उपभोक्ता समूह या क्षेत्रांत विस्तार पावली. भांडवलशाही व्यवस्थेची जन्मभूमी असणाऱ्या इंग्लंड देशातच सहकाराचा जन्म व विस्तार व्हावा हे तशा अर्थाने नवलच! औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लंडमध्ये राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या. सहकारी गृहनिर्माण, दुग्धव्यवसाय, कापड गिरण्या, बँका, कामगारसंघटना, शेतकरी सहकारी संघटना अशा कितीतरी क्षेत्रांत सहकार तत्त्वाचा अवलंब इंग्लंड तसेच युरोपात अन्य ठिकाणी केला गेला. इंग्लंड येथे झालेल्या यशस्वी प्रयोगानंतर ही सहकार चळवळ फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, ऑस्ट्रेलिया, नॉर्वे, मलेशिया, कोरिया, तैवान, सिंगापूर अशी सर्वदूर पसरली. भांडवलशाही आणि समाजवादी अशा टोकाच्या उत्पादन व्यवस्थांच्या मधला 'सुवर्णमध्य', एक पर्यायी व्यवस्थापन, उत्पादन तंत्र म्हणून सहकार क्षेत्राकडे पाहिले जाऊ लागले.

आशिया खंडातील महत्त्वाची अर्थव्यवस्था असणाऱ्या भारतात सहकार क्षेत्राची पायाभरणी १८९२ साली सुरू झाली. भारतामध्ये सहकारी चळवळीचा इतिहास हा १०० वर्षांपेक्षा जास्त काळाचा आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात शेतकऱ्यांच्या कर्जविषयक अडचणी सोडवून सावकारशाही उखडून काढण्यासाठी सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्याचे निकोलसन समितीने सुचवले व त्यानुसार ग्रामीण पतव्यवहार सांभाळण्यासाठी पतसंस्था निर्माण झाल्या. १९०४ साली सहकारी

या जगात जे जे थोर आणि सुंदर दिसते ते सारे धुक्यासारखे विरून जाते आणि त्याचा नाश होतो - स्पेन्सर

पतसंस्था कायदा करण्यात आला व तीच सहकार चळवळीची सुरुवात असल्याचे मानले जाते. त्यानंतर सहकार कायद्यात अनेक सुधारणा झाल्या व सहकार चळवळ फोफावत गेली. फक्त पतव्यवहारापुरते मर्यादित असलेले सहकाराचे क्षेत्र त्यानंतर कृषी, बँका, दुग्ध व्यवसाय, गृहनिर्माण अशा सर्वच क्षेत्रांत विस्तारले. सहकार चळवळीच्या देशातील विस्तारामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र व गुजरात या राज्यांनी आघाडी घेतली.

१९४६ साली गुजरात येथील आनंद येथे स्थापन झालेली 'अमूल' (Anand Milk Union Ltd.) ही सहकार तत्त्वावरील आस्थापना या चळवळीच्या इतिहासातील मैलाचा दगड आहे. आज घडीला २० लाखांपेक्षा जास्त भागधारक या आस्थापनेचे सदस्य आहेत.

महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास १९२५ हे साल सहकार चळवळीच्या राज्यातील विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. १९२५ साली बॉम्बे सहकारी संस्था कायदा पारीत करण्यात आला व १९६० साली त्यात सुधारणा करण्यात आल्या. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६० साली राज्य सरकारने महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा निर्माण केला. बॅ. धनंजयराव गाडगीळ, सहकारमहर्षी विठ्ठलराव विखे पाटील या धुरिणांनी सहकाराच्या जोरावर राज्याच्या आर्थिक प्रगतीची गती कायम राखली. स्वातंत्र्योत्तर काळात राज्याच्या आर्थिक विकासात सहकाराची भूमिका केवळ पतसंस्थांपुरती मर्यादित न राहता इतर अनेक क्षेत्रांत या चळवळीची मुळे रुजत गेली. आजच्या परिस्थितीत शेती, वित्त, गृहनिर्माण, बँका, हातमाग-यंत्रमाग, साखर कारखाने, तेलगिरण्या, दूध डेअऱ्या, शहरी पतसंस्था, गृहवित्त अशा एकूण २० पेक्षा जास्त प्रकारच्या सहकारी संस्था राज्यात आहेत. नाबार्ड या बँकेच्या सहकार्याने राज्यातील सहकारी बँका काम करतात. आजमितीला राज्यातील शहरी व ग्रामीण पतसंस्थांची एकूण संख्या ४९,९५९ एवढी असून बिगरवित्तीय संस्था १,५५,१४१ एवढ्या आहेत. तसेच नोंदणीकृत अशा सहकारी साखर कारखान्यांची संख्या २०१ एवढी आहे. राज्याच्या विकासात रोजगार, उत्पादन व उत्पन्न या दृष्टीने सहकार क्षेत्राचा वाटा १५% पेक्षा (जीडीपीच्या तुलनेत) जास्त आहे. यावरून राज्याच्या आर्थिक भविष्याच्या दृष्टीने सहकार चळवळ मोलाची कामगिरी बजावतेय हे स्पष्ट आहे. परंतु या आकडेवारीच्या मागे असलेले वास्तव काय आहे? हे तपासणे गरजेचे आहे.

वाढत्या आर्थिक अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर गरजेचे ठरते. सहकार चळवळीची मुळे राज्याच्या सर्वच क्षेत्रांत रुजलेली असली तरी विकासाच्या दृष्टीने सहकार चळवळीचे राज्यातील अस्तित्व पुढील क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाचे आहे.

१) सहकारी बँका

२) सहकारी साखर कारखाने

३) सहकारी दूध डेअरी आस्थापन

या संदर्भात सहकार चळवळीचे आजचे वास्तव समजावून घेण्याचा प्रयत्न करू या.

**१) सहकारी बँका**

सहकारी क्षेत्रातील बँकांसाठी ग्रामीण, जिल्हास्तरीय व राज्य मध्यवर्ती बँक अशी तिस्तरीय रचना असून राज्यात गावपातळीवर कृषीपतसंस्था आहेत व जिल्हा पातळीवर ३५ पेक्षा जास्त जिल्हा सहकारी बँका आहेत. लघु उद्योग, मायक्रो फायनान्स (लघुपतपुरवठा), महिला बचत गट या आर्थिक घटकांच्या दृष्टीने सहकारी बँका महत्त्वाची भूमिका पार पाडतात. असे असले तरी निश्चलनीकरण, खाजगी व व्यावसायिक बँकांशी असलेली स्पर्धा व जागतिकीकरणाचा रेटा या आव्हानांमुळे

राज्यातील सहकारी बँकिंग क्षेत्र डबघाईला आले आहे. याच बरोबरीने, सहकारी बँकांमध्ये असणारा राजकीय हस्तक्षेप आणि सत्तास्पर्धा यामुळे या क्षेत्राची अपरिमीत हानी होते आहे. आजमितीला सुमारे २० पेक्षा जास्त जिल्हा बँकांवर रिझर्व बँकेची नजर असून सहकारी बँकांतील घोटाळे आणि थकीत कर्जाचा प्रश्न हे नित्याचे आहे. याचा फटका राज्याच्या आर्थिक विकासाला बसतो आहे.

**२) सहकारी साखर कारखाने**

स्वातंत्र्योत्तर काळात साखर कारखान्यांची झालेली भरभराट हा महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अभिमानाचा विषय होता. परंतु कालांतराने या क्षेत्रातही राजकीय अपप्रवृत्ती शिरल्या आणि साखर कारखान्यांचे क्षेत्र बजबजपुरीने मानले. ऊस या नगदी पिकावर प्रचंड खर्च सोसून त्यातून नफा कमवू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला न देता व खुल्या बाजारात ग्राहकांना अयोग्य किंमतीला साखरेचा पुरवठा करून साखर कारखाने व त्यांचे संचालक मंडळ दुहेरी समस्या निर्माण करत आहेत. साखरसम्राट, शुगर लॉबी हे शब्द सामान्यांच्या देखील परिचयाचे झाले असून साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांच्या निवडणूका म्हणजे राजकीय आखाडा बनला आहे. इतर पिकांप्रमाणे ऊसालाही सरकारकडून हमीभाव मागण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली हा ह्याचाच परिणाम होय. सुदैवाने पश्चिम महाराष्ट्राच्या सुपीक पट्ट्यात ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या अजून झाल्या नसल्या तरीदेखील ऊसाच्या बाजारभावाबद्दल व त्यावरील उत्पन्नावरून शेतकऱ्यांमधली अस्वस्थता वाढते आहे. सुस्थितीतील साखर कारखाना आजारी पाडणे, उत्पादनात खंड पाडून सरकारी अनुदान लाटणे असे प्रकार सर्रास चालू आहेत.

**सहकारी दूध डेअऱ्या**

'अमूल'च्या धर्तीवर राज्यातही सहकारी तत्त्वावर दूध संघ उभे राहिले. एकत्रित दूध संकलन करून वितरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. दूध उद्योगाची रोजची उलाढाल १०० कोटी रुपयांची असली तरी दूध उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरले, याला कारणे अनेक. साठवणुकीच्या साधनांचा अभाव, अत्यंत कमी मार्जिन, किंमतीत चढ-उतार, खाजगी दूध विक्रेत्यांशी स्पर्धा, दुग्धउत्पादनांवरील प्रक्रिया केलेल्या पदार्थांची वाढती मागणी असे अनेक पैलू या समस्येला आहेत. यावर उपाय म्हणून सरकारने प्रत्येक लिटरमागे ५ रुपये हमीभाव /अनुदान द्यावे या मागणीकरिता नुकतेच शेतकरी आंदोलन करण्यात आले व मुंबई-पुणे या शहरांची दूधकोंडी करण्यात आली.

या समस्या व त्यांची कारणे लक्षात घेता हमीभाव, अनुदान, सरकारी मदत ही तात्कालिक उपायांची जंत्री कितपत प्रभावी ठरेल असा प्रश्न पडतो. केवळ दूध व्यवसायच नाही, तर एकुणातच सहकार तत्त्वावर चालणाऱ्या इतर महत्त्वपूर्ण क्षेत्रांत पुनरावलोकन करण्याची निकड आहे. 'सहकार पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात रोजगार, उत्पादन-उत्पन्नप्रक्रिया, बाजार प्रक्रिया या सर्वांवरच सहकार क्षेत्राचा काय प्रभाव व परिणाम आहे हे तपासून पाहणे गरजेचे आहे. सहकार क्षेत्राला भेडसावणारा व्यवस्थात्मक धोका (Systemic challanges), राजकीय हस्तक्षेप, ग्रामीण-नागरी अनुशेष या सर्व समस्यांचा ऊहापोह करून सहकार चळवळीचे पुनरुज्जीवन करावे लागेल. अन्यथा विकासासाठी वरदान ठरलेली ही सहकार चळवळ मोडीत निघेत व 'विना सहकार नाही उद्धार' हे वचन केवळ पुस्तकातील वचन म्हणून शोभून दिसेल!

**- अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई
भ्रमणध्वनी - ७७६८०२७६५८

●●●

# अमृतवाणी संस्कृतभाषा

*श्रावण पौर्णिमा, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा या नावाने ओळखली जाणारी पौर्णिमा ही 'संस्कृतदिन' म्हणून भारतभर साजरा होते. नुकतीच २६ ऑगस्ट रोजी ती साजरी करण्यात आली. संस्कृत भाषा ही सर्व भारतीय भाषांची जननी आहे. सोबत ती विज्ञानाची व तंत्रज्ञानाची भाषा आहे. संस्कृतची महती सांगणारा हा लेख महाराष्ट्र शासनाचे आयुर्वेद विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. व्यंकट पुरुषोत्तम धर्माधिकारी यांनी लिहिलेला आहे - संपादक*

श्रावण पौर्णिमा हा दिवस 'रक्षाबंधन' म्हणून आपण साजरा करतो. सागराची पूजा करून हा दिवस 'नारळी पौर्णिमा' म्हणून साजरी केली जाते.

तसेच, आजचा दिवस 'संस्कृत दिन' म्हणून देखील दरवर्षी साजरा केला जातो. आजच्या दिवशी केंद्र शासनातर्फे आणि राज्य शासनातर्फे संस्कृत विद्वानांचा सत्कार केला जातो. अनेक शाळा, महाविद्यालयांतर्फे आजचा दिवस 'संस्कृत दिन' म्हणून साजरा केला जातो. संस्कृत भाषेचा प्रचार प्रसार व्हावा हा या मागचा मुख्य उद्देश आहे.

संस्कृत भाषा ही प्राचीन भाषा असल्याने या भाषेचा प्रभाव इतर भाषांवर आहे. साधारणतः ऐंशी टक्के संस्कृत शब्द हे भारतीय भाषांत आहेत. Mother- माता, Father - पिता, Husband - हस्तबंध, Trignometery - त्रिगुणमात्रा, Upper - उपरि.

भारताच्या जडणघडणीमध्ये संस्कृतचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संस्कृत भाषा ही भारतीयांचे अनमोल धन आहे, ज्यामुळे संपूर्ण विश्वामध्ये भारताचे वेगळे स्थान निर्माण झाले आहे. कारण वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्रे, रामायण, महाभारत इ. अत्यंत मोलाची ग्रंथसंपदा संस्कृत भाषेत आहे. पतंजली योगसूत्र, वात्सायनाचे कामशास्त्र, कालिदासाचे शाकुंतल, चिकित्साविषयक, आयुर्वेद इ. विविध विषयांवरील ग्रंथसंपदा संस्कृतमध्ये आहे. या भाषेतच राम-लक्ष्मण-भरताचे सद्‌बंधुत्व, सीता व सावित्रीचे चारित्र्य, भीम-अर्जुन-कर्णादिंचे शौर्य, हर्षवर्धनाची आचारपद्धती, अशोकाचे धम्मचक्र, भरतमुनींचे नाट्यशास्त्र, व्यवहारात उपयोगी असलेली नीती सांगणारे भर्तृहरीचे नीतीशतक इ. अनेक बाबी असल्याने भारतीयांच्या जडणघडणीत यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

आपल्या भारतभूमीमध्ये अनेकप्रकारची विविधता आहे. यामध्ये विविध जातीधर्म, विविध प्रांत, विविध उपासनापद्धती आढळून येतात. तरीही हे सर्व लोक आपल्या देशात आनंदाने राहतात. त्याचे प्रमुख कारण आपली भारतीय संस्कृती 'संस्कृतिः संस्कृते मूलम्' अर्थात संस्कृतीचे मूळ संस्कृत भाषेत आहे. ही भाषा सर्व विविधतेतून एकता निर्माण करते; जसे सर्व मणी एकत्र सुत्रात ओवल्यावर जी माळ तयार होते. दोरा तुटल्यावर मणी इतस्ततः गळून पडतात. त्याचप्रमाणे संस्कृतकडे जर दुर्लक्ष झाले तर राष्ट्र एकसंध राहणार नाही.

**''मालायासूत्र विच्छेद शीर्यन्ते मणयो यथा**
**तथा संस्कृत विच्छेदे राष्ट्रं शीर्येत खंडशः।।''**

सध्याच्या काळात संगणकासाठी सर्वात जवळची भाषा जर कोणती असेल तर ती संस्कृत! संगणक अभ्यासात दोन गोष्टी येतात.

---

चैतन्यमय नीतीची नजर बुद्धीपेक्षा जास्त दूरगामी असते. - जे. ए. फ्रॉऊड

१. संगणकाची भाषा इंग्रजी सर्वांना शिकविणे,

२. भारतीय भाषा संस्कृत संगणकाला शिकविणे.

मला दुसरा विकल्प हा योग्य वाटतो.

संस्कृत भाषा संगणकाला जवळची आहे. कारण-

१. ही सूत्रबद्ध आणि व्याकरणाने परिपूर्ण भाषा आहे.

२. यात इंग्रजीसारखे गबाळे व्याकरण नाही. संस्कृतमध्ये वाक्यातील घटकांचा क्रम बदलला तरी अर्थ बदलत नाही. जसे - अहं पुस्तकं पठामि। पुस्तकं अहं पठामि। पठामि अहं पुस्तकं।

इंग्रजीमध्ये सबजेक्ट-व्हर्ब-ऑबजेक्ट-कॉम्पलीमेंट-ॲडव्हर्बियल (SVOCA) असा क्रम सांगितला आहे.

दरवर्षी शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत येणारे विद्यार्थी हे मोठ्या संख्येने संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण घेताना आढळतात. व्यवहारात बोलताना संस्कृतचा वापर होतो. शुभस्य शीघ्रम्। शुभास्ते पंथानः। जीवेत शरदः शतम्।

वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादींमध्ये संस्कृत सुभाषितांचा वापर अधिक प्रभावी ठरतो. इंटरनेटवर देखील www.sanskrit.nic, www.arvindasharum.nic अशी संकेत स्थळे आहेत.

संस्कृतचा सर्व शास्त्रांशी आणि विज्ञानाशी अत्यंत जवळचा संबंध आहे.

**१. गणितशास्त्रावर** भास्कराचार्यांचा 'लीलावती' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. गणिताच्या बाबतीत आइन्स्टाईन म्हणतात की, आम्ही भारतीयांचे नेहमी ऋणी आहोत. कारण त्यांनी आम्हाला अंकगणना शिकविली. शून्याचा शोध लावला. याबाबत -

पायथागोरसचा सिद्धान्त हा बांधायन ऋषींनी त्यांच्या शुल्बसूत्रात सांगितला आहे. याचा शोध आपल्या यज्ञाच्या वेदी तयार करताना लागला. कर्ण$^{२}$=पाया$^{२}$+उंची$^{२}$

**२. भौतिकशास्त्र** - नोबेल पारितोषिक विजेते अल्बर्ट आइन्स्टाईन यांचा ऊर्जा अक्षयतेचा नियम (Law of conservation of Energy) प्रसिद्ध आहे. हाय नियम आपल्या उपनिषदांच्या शांतीमंत्रांमध्ये सांगितला आहे.

**ॐ पूर्णमदः, पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुद्च्यते, पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवाव शिष्यते।**

आधुनिक शास्त्रज्ञांनी केलेली अणूची व्याख्या इ. स. पूर्व कणाद महर्षिंनी केली आहे.

**जालान्तर्गते भानोः यद् सूक्ष्मं दृश्यते रजः**
**तस्य षष्ठतमो भागः परमाणू स उच्यते।**

परमाणू-कवडसा-रजःकण-त्याचा १/६

बहिर्गोल भिंगात सूर्यकिरणे एकत्र येतात. त्यांच्या संपर्कात कागद ठेवला तर तो पेट धेतो हा सिद्धांत महाभारतामध्ये आला आहे.

**यथादित्यान्मणेश्चापि वीरुभ्दयश्चैव पावकः, जायन्त्येवं समुद्यात, कालानामिव जन्तवः।**

**३. रसायनशास्त्र** - अनेक आयुर्वेदीक औषधांमध्ये सोने, रूपे, लोह, शिसे इ. धातूंचा वापर होतो. याची शुद्धी कशी करावी याचे ज्ञान संस्कृतमध्ये आयुर्वेदात आहे.

अहो, धातू म्हटला की तो जड असतो; जसे लोखंड, सोने इ. पाण्यात टाकले की ते बुडतात, परंतु या धातूचे शोधन-मरण इ. संस्कार करून यापासून तयार होणारे भस्म मात्र पाण्यावर तरंगते! यालाच भस्म परीक्षेत आयुर्वेदात 'वारितर' असे म्हणतात. यावरून

रसायनशास्त्राच्या अभ्यासासाठी संस्कृत महत्त्वाचे आहे.

**४. आयुर्वेद शास्त्र –** यावरील चारक संहिता, सुश्रुत संहिता, भाव प्रकाश इ. सर्व ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. सुश्रुताची प्लास्टीक सर्जरी ही आधुनिक शल्य शास्त्राला दिशा देणारी आहे. आहार, विहार, वनस्पती इ.च्या ज्ञानाचा सविस्तर अभ्यास आयुर्वेदात सांगितला आहे.

**५. खगोलशास्त्र –** यामध्ये चंद्राची शुक्लपक्षात वृद्धी व कृष्णपक्षात क्षय; हा तो पृथ्वीभोवती फिरत असल्यामुळे होतो असा उल्लेख महाभारतात आहे.

''पथाचंद्रो हीमावास्याम् अलिंगत्वान्ना दृश्यते,
न व नाशो स्य भवति तया विद्धि शरीरिणाम्।।''

३. संस्कृतमध्ये जे लिहितो ते तसेच वाचतो, पण इंग्रजीमध्ये तसे नाही.

Listen – लिस्टन – लिसन
Talk – टाल्क – टॉक

संस्कृत ही संगणकाला कशी जवळची भाषा आहे यावर CDAC मध्ये संशोधन सुरू आहे. IIT पवईमधील संस्कृतचे प्राध्यापक डॉ. मल्हार कुलकर्णी हे तेथील विद्यार्थ्यांना संगणकासाठी संस्कृत कसे उपयुक्त आहे यावर संशोधन करत आहेत. पाणिनीय व्याकरणाच्या सूत्रबद्धतेचा संगणकाच्या सॉफ्टवेअर प्रणालीशी कसा जवळचा संबंध आहे यावर त्यांचे विशेष संशोधन आहे. या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना २००८ सालीचा युवा विद्वत्त राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. इंटरनॅशलन इन्स्टिटयूट ऑफ इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी हैद्राबाद येथे कॉम्प्युटेशनल लिंगविस्टीक्स (संगणकीय उच्चार शास्त्र) यावर संशोधन सुरू आहे.

सध्या प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढते आहे. त्यामुळे कुठलेही क्षेत्र असो; त्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी लागणारा आत्मविश्वास, विषय मुळातून समजून घेण्याची वृत्ती, चारित्र्य, स्मरणशक्ती इ. गोष्टी संस्कृत भाषा येणाऱ्यामध्ये अधिक जाणवतात. सध्या प्रचंड ताणतणाव आहे. यावेळी येणारा एकाकीपणा संस्कृतमुळे नष्ट होतो. यालाच इंग्रजीत Sence of Belongingness असे म्हणतात.

विद्यार्थ्यांमध्ये पाठांतर-शक्ती वाढल्याने बुद्धी कुशाग्र होते. फडत्राविस नावाच्या शास्त्रज्ञाने संस्कृत पठण व इतर भाषा पठण याचा तौलनिक अभ्यास केला. त्यांनी ज्या व्यक्तींना जी भाषा येते त्यांना त्यांची स्वतःची भाषा सोडून अन्य भाषेमधील मजकूर वाचण्यास सांगितला आणि नंतर त्यांचे नाडी, मेंदूमधील गती इ. चा अभ्यास केला. त्यावेळी संस्कृत पठणानंतर नाडी, मेंदूमधील गती इ. मध्ये सकारात्मक बाबी आढळून आल्या. यावरून संस्कृतचा अर्थ न कळला तरी त्याच्या पठणाने आपल्याला हा फायदा होतो. व्यवहारात अनेक स्तोत्र पठणाने हा अनुभव येतो.

संस्कृतमुळे विद्यार्थ्यांची उच्चारण शुद्धता वाढते. म्हणून पत्रकार, लेखक, आकाशवाणी वृत्तनिवेदक इ.नी संस्कृतचा अभ्यास केल्यास त्यांच्या क्षेत्रात त्यांना निश्चित फायदा होतो. त्यांचे भाषेचे ज्ञान वाढते, भाषा शुद्धी होते.

याप्रसंगी मला एक महत्त्वाचा संदेश द्यावा वाटतो की, संस्कृतला राजकारणातून बाहेर काढून तिला केवळ धार्मिक भाषा म्हणून पाहणे बंद करावे. इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती, कन्नड इ. भाषांप्रमाणे संस्कृतला केवळ भाषा म्हणून पहाणे गरजेचे वाटते. धार्मिक भाषा म्हटल्यामुळे तिच्यापासून दूर राहिले जाते. यालाच इंग्रजीत Bleesful Ignorance असे म्हणतात. फार चांगली भाषा म्हणून दुरूनच तिच्याकडे पहाणे बंद व्हायला हवे.

---

पैशाची किंमत कळावी असे वाटत असेल, तर दुसऱ्याकडे जाऊन ते उसने मागण्याचा प्रयत्न करून पाहा! – बेंजामिन फ्रँकलीन

संस्कृत ही मृतभाषा नसून तिचा व्यवहारात आपण वापर करतो. यासाठी राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र संस्कृतसाठीची विद्यापीठे आहेत. राष्ट्रीय संस्कृत संस्थान- दिल्ली आणि राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ- तिरुपती इ. विद्यापिठे आहेत. 'संस्कृत भारती' दिल्ली मार्फत संभाषण संदेश हे मासिक आणि भारतात परदेशात संस्कृतचे संभाषण वर्ग घेतले जातात. यामुळे संस्कृत भाषा बोलणारा मोठा वर्ग भारतात निर्माण होत आहे.

'जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय विद्यापीठ' दिल्ली आणि भारतातील प्रत्येक विद्यापीठात स्वतंत्र संस्कृत विभाग आहे. अनेक महाविद्यालये, शाळांमध्ये हा विषय शिकविला जातो. या मधून संस्कृतचे शिक्षण घेऊन लाखो विद्यार्थी बाहेर पडतात. अनेक नियतकालिके, साप्ताहिके याद्वारे संस्कृत भाषा प्रसाराचे कार्य सुरू आहे.

सन २००८ चा सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार संस्कृत पंडित सत्यव्रत शास्त्री यांना मिळाला आहे. यावरून संस्कृत ही मृतभाषा निश्चित नाही हे स्पष्ट होते.

**६. भूगर्भ शास्त्र** - यामध्ये पृथ्वी गोल आहे हे फार प्राचीन काळी सांगितले आहे.

**मृदम्बवग्न्यनिलाकाश पिण्डो यं पांचभौतिकः,**
**कपित्थफलवद वृत्तः सर्वकेंद्रे खिलाश्रयः।**
**स्थिरः परेशशक्त्येव सर्वगोलादधः स्थितः।।**

आर्यभट्टांनी पृथ्वीचा व्यास हा १०५० योजने असा सांगितला आहे. 'त्रिलाभूः' हे सूत्र आहे. १०५० १२=१२,६०० कि.मी. सांगितला आहे. आधुनिकांचेही हेच मत आहे.

**७. विमानशास्त्र** - पुष्पक विमानाचे वर्णन रामायणात आहे. विमान वरून खाली उतरताना, जमिनीला स्पर्श करताना अपघाताची शक्तता जास्त असते असे भारद्वाज ऋषींनी सांगितले आहे.

**८. ज्योतिषशास्त्र** - असंख्य ग्रह, अन्य सौरमंडळे असण्याची संभावना इ. मूलगामी विचार भारतीय ज्योतिष शास्त्रात सांगितले आहेत. ग्रहांची स्थिती, त्यांचे परस्पराकर्षण, ग्रहणांचे स्वरूप इ. विषयक विस्तृत वर्णन यामध्ये आढळते.

**९. संगीतशास्त्र** - संगीत हे भारतीयांचे वैशिष्ट्य आहे. याचा परिचय प्रत्येक व्यक्तीला असणे अपेक्षित आहे. ''साहित्यसंगीतकलाविहिनः साक्षात पशुः पुच्छविषाणहिनः।'' असे म्हटले आहे. संगीत चिकित्साविषयक 'संगीत-चिकित्सा रत्नाकर' नावाचा ग्रंथ असून यामध्ये ३४,८०० रोगांबाबत सविस्तर वर्णन केले आहे.

यावरून संस्कृतचे सर्व शास्त्रांमधील योगदान अनन्य साधारण आहे.

**''भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती।**
**तस्या पि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम्।।''**

**- डॉ. व्यंकट पु. धर्माधिकारी**
एम.डी. (आयुर्वेद) एम. ए. (संस्कृत)
सहाय्यक संचालक, आयुर्वेद विभाग,
कोकण भवन, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई.
भ्रमणध्वनी : ९४२१४७९५५०

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# पूर्वांचलच्या सावलीत : उत्तर पूर्व राज्यांची सफर

*जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वृत्तविद्या व संज्ञापन विभागाने आयोजित केलेल्या भारताच्या ईशान्येकडील सात राज्यांवर आधारित एका सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन दि. २३ ऑगस्ट रोजी झाले. इंग्रजी बीएमएम द्वितीय वर्षाच्या गौरी अंबाजी परब या विद्यार्थिनीने या महोत्सवाचे केलेले सविस्तर वार्तांकन लेख स्वरूपात - संपादक*

'माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे' असे आपण आपल्या प्रतिज्ञेत म्हणतो. अभिमान असावा अशी बाब आहेच मुळी ती!

आपला प्रिय भारत देश विविधतेने नटलेला आणि तरीही एकता असणारा असा आपला भारत. आपल्या देशात अनेक वेगवेगळ्या प्रदेशांतील, भागांतील भिन्न संस्कृतीचे लोक राहतात. एकमेकांना सांभाळत, एकमेकांसोबत आपआपली संस्कृती जोपासत ते आनंदाने एकत्र नांदत असतात. 'To involve in the life of others and to involve others in our life is culture' या वाक्यात तथ्य आहे.

संस्कृती म्हणजे चालीरीती, परंपरा, मूल्ये, विचार, रूढी इत्यादी आणि अगदी महत्त्वाचं म्हणजे समाजातील आपली सामाजिक वर्तणूक कशी आहे यावरूनही संस्कृती पाहिली जाते.

भारत देश हा संस्कृतीने अगदी संपन्न आहे. संस्कृती आणि परंपरांसाठी आपला देश अत्यंत प्रसिद्ध आहे. देश कितीही आधुनिक होत असला तरी लोकांच्या मनात एकत्वाची भावना कायम आहे आणि हीच गोष्ट विलक्षण आहे. येथे प्रत्येकजण आपली संस्कृती जपत शांततेत राहतो. लोकांचे सामाजिक बंध चिरकाल टिकणारे आहेत.

संस्कृती या शब्दामध्ये सम्+कृ असे दोन संस्कृत धातू आहेत. याचा अर्थ 'चांगले करणे' असा होतो. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार. भारतीय संस्कृतीने, तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे.


साने गुरुजींनी भारतीय संस्कृतीचे यथार्थ वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''भारतीय संस्कृती म्हणजे सहानुभूती, भारतीय संस्कृती म्हणजे विशालता, भारतीय संस्कृती म्हणजे सत्याचे प्रयोग. भारतीय संस्कृती म्हणजे सारखे ज्ञानाचा मागोवा घेत पुढे जाणे. जगात जे जे काही सुंदर, शिव व सत्य दिसेल ते ते घेऊन वाढणारी ही संस्कृती आहे. मोठेपण कोठेही दिसो, भारतीय संस्कृती त्याची पूजा करील. आदराने त्याचा संग्रह करील. भारतीय संस्कृती संग्राहक आहे. ती सर्वांना जवळ घेणारी आहे.

''**सवेर्षामविरोधेन ब्रह्माकर्म समारंभे।**'' असे म्हणणारी ती आहे.

निरनिराळे सण, उत्सव, देवस्थाने, भारतातील सर्व जाती-जमाती, त्यांची वैशिष्ट्ये, भारतातील आदिवासी जमाती, त्यांची राहणी, प्रादेशिक भाषा, विविध कला, साहित्य, लोकसाहित्य, नृत्ये, लोकनृत्ये, मूर्तीकला, चित्रकला, विविध स्थापत्यशैली व अन्नातील विविधता या सर्व मुद्द्यांना समाविष्ट केलेले असते ती म्हणजे संस्कृती.

गडगंज पैसा जवळ असणारे भिकारीही आपणाला आढळतात! - सिनेका

भारतीय संस्कृती आणि त्यातील नवनवीन गोष्टींचा उलगडा व्हावा यासाठी ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात सालाबादप्रमाणे यावर्षीही 'सांस्कृतिक कार्यक्रमाचे' आयोजन केले गेले. हा कार्यक्रम २३ ऑगस्ट रोजी पत्रकारिता व संज्ञापन विभागाने आयोजित केला होता. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अरुण करमरकर हे आले होते. अरुण करमरकर हे पत्रकार व संपादक असून त्यांनी २५ वर्षे पत्रकारितेत कार्य केले. ७ वर्षे अखिल भारतीय विद्यार्थी संघटनेत काम केले. याशिवाय माओवाद व अनेक विषयांवर त्यांचा सखोल अभ्यास आहे. 'मुंबई तरुणभारत', 'साप्ताहिक', यांसारख्या वृत्तपत्रांचे ते संपादक आहेत. त्यांच्या 'पोलादी राष्ट्रपुरुष' या वल्लभभाई पटेलांवरच्या पुस्तकास सन्मान प्राप्त झालेला आहे.




या सांस्कृतिक कार्यक्रमाचे हे तिसरे वर्ष होते. या वर्षीचा विषय होता 'उत्तरपूर्व भारताची संस्कृती'. उत्तर भारतात अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा यांचा समावेश होतो. या राज्यांचा इतिहास अत्यंत खोल आहे. प्रारंभी फक्त तीन प्रमुख राज्ये होती. आसाम सर्वात मोठे राज्य होते आणि मणिपूर व त्रिपुरा ही उमदा राज्ये होती. त्यानंतर क्रमाक्रमाने बाकीची चार राज्ये तयार झाली. नागालँड १९६३ मध्ये, मेघालय १९७२ मध्ये, मिझोरम आणि अरुणाचल प्रदेश १९८७ मध्ये सिक्कीम हे राज्य पूर्वीपासून समाविष्ट नव्हते. अलीकडील काळातच ते समाविष्ट केले गेले. या राज्यांमध्ये धार्मिक, पारंपरिक आणि सांस्कृतिक विविधता आहे.

अरुण करमरकर यांनी उत्तरपूर्व भारताबद्दल अत्यंत माहितीपूर्वक असे भाषण दिले. 'एकत्वाची भावना' या सर्व राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्यांनी या भागातील सर्व राज्यांबद्दल थोडक्यात पण मुद्देसूद माहिती दिली. आसाम राज्यावर त्यांनी अधिक प्रकाश टाकला. आसाम हे राज्य वन्यजीवन आणि चहा लागवडीसाठी प्रसिद्ध आहे. तसेच ब्रह्मपुत्र नदी हे आसामचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. आपल्याकडे नदी ही मातेसमान मानली जाते. म्हणून गंगामाता असे आपण म्हणतो. परंतु ब्रह्मपुत्र नदी आसाममधील जनजीवनास पित्यासमान आहे, कारण तेथील लोकांचे जीवन हे ब्रह्मपुत्र नदीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे आणि म्हणूनच यास 'ब्रह्मपुत्र' हे पुरुष नाव प्राप्त झाले. याशिवाय आसाममधील बिहू नृत्य अतिशय लोकप्रिय आहे व आसामी संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा घटक. बिहू सणाच्या दरम्यान हे नृत्य सादर केले जाते. कापणीच्या वेळी हा नृत्यप्रकार सादर होतो, असे श्री. करमरकर म्हणाले.

तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, 'एक चांगला श्रोता असणं आणि आपण किती शांत राहू शकतो ही आपल्या संस्कृतीची पहिली खूण आहे.' तसेच त्यांच्या समुपदेशन कार्यातील काही अनुभव सांगितले. उत्तरपूर्व भारतातील काही मुली त्यांना या समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असताना भेटल्या. त्यांच्या मेघा, भूमी या नावांतच उत्तरपूर्व भूमीचा गंध येतो, असे त्या म्हणाल्या. 'संस्कृती ही नेहमीच

सामर्थ्यावर आधारित असते व बी.एम्.एम्. विभाग हे सामर्थ्य आहे.' असे म्हणत त्यांनी कौतुकही केले. विजय कांत यांची एक कविता त्यांनी म्हटली –

मेरी बेटी, बहुत छोटी बेटी,
तुझे कैसे बताऊँ
की दुनिया बड़ी बेरहमी और जालीम है
यहाँ हृदय समझनेवाले बहुत कम है।

विद्यार्थ्यांनी पूर्ण मेहनत घेऊन पॉवरपॉईंट सादरीकरण, लघुचित्रपट, माहितीपट व नाटक सादर केले. सगळ्यांनीच या वैविध्यपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घेतला व अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

या राज्यांमधील काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेऊ.

**१) आसाम – कामाख्या मंदिर**



शक्तीपीठांतील सर्वात जुनं व शक्तिशाली अशी ओळख आसाममधील कामाख्या मंदिराची आहे. हे एक हिंदू मंदिर असून ते देवी कामाख्या मातेला समर्पित केलेलं आहे.

**२) लक्ष्मणझुला – उत्तराखंड**

लक्ष्मणझुला हा गंगा नदीच्या एका बाजूकडून दुसरीकडे जाणारा पूल आहे. उत्तराखंड राज्यातील



ऋषीकेश या शहराचे ते महत्त्वपूर्ण व अतिशय लोकप्रिय स्थान आहे. असे म्हटले जाते की, हा पूल लक्ष्मणाकडून पार केलेला आहे.

**३) मिझोरम – तामदिल सरोवर**



मिझोरम राज्यातील सर्वात मोठे सरोवर म्हणून हे सरोवर ओळखले जाते. हे मनुष्यनिर्मित सरोवर असून त्याची निर्मिती प्रामुख्याने राज्यातील नैसर्गिक आकर्षण म्हणून राज्याच्या पर्यटनासाठी केली गेली.

**४) सिक्किम – युमथांग दरी**



ही फुलांची दरी म्हणून ओळखली जाते. बहुसंख्य

गरम पाण्याचे झरे येथे आढळतात. ज्यामुळे अत्यंत गारठवून टाकणाऱ्या थंडीतही उबदारपणा अनुभवता येऊ शकतो. सिक्किम हे राज्य आकाराने जरी लहान असले तरी त्याची नैसर्गिक सुंदरता मात्र कमालीची आहे.

**५) त्रिपुरा – उज्जयंता महाल**



उज्जयंता महाल हा आगरतळा येथे स्थित असलेला त्रिपुरा राज्याचा पूर्वीच्या काळातील महाल आहे व संग्रहालय आहे. वर्तमान काळात आगरतळा हे त्रिपुरा या भारतीय राज्याची राजधानी आहे.

**६) मणिपूर कांगला गड**




मणिपूरमधील इंफाळ येथे स्थित असलेली ही जुनी वास्तू आहे. इंफाळ नदीच्या पूर्व आणि पश्चिम या दोन्ही बाजूंना हा गड स्थित होता. परंतु आता तो फक्त नदीच्या पश्चिम दिशेसच स्थित आहे. कांगला या शब्दाचा अर्थ होतो, 'कोरडा भूभाग'.

**७) मेघालय – एलिफंट फॉल (धबधबा)**



एलिफंट फॉल हे मेघालयातील पर्यटनाचे प्रमुख आकर्षण आहे. मेघालय राज्याची राजधानी शिलाँगच्या सीमेवर हा धबधबा आहे. केंद्रीय उंचवट्याचा प्रदेश व सर्वात सुंदर अशी याची ओळख आहे.

**८) अरुणाचल प्रदेश – जवाहरलाल नेहरू संग्रहालय**




अरुणाचल प्रदेशमधील अत्यंत प्रसिद्ध असे ठिकाण आहे. याची स्थापना १९८० मध्ये झाली. आदिवासी जनजीवनाचे पैलू हे संग्रहालय दर्शवते.

**– गौरी अंबाजी परब**
जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे.

•••

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- अध्ययन व अध्यापन अधिक प्रभावी व्हावे यासाठी शाळेत प्रोजेक्टर लावण्यात आले. या प्रोजेक्टर वर्गाचे उद्घाटन दि. ११ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मान. डॉ. श्री. विजय बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी मान. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सर्व शिक्षक उपस्थित होते.
- शाळेत बरेच विद्यार्थी असे असतात की त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या समस्यांमुळे त्यांचा इतरांना त्रास होतोच पण ते स्वतःही अभ्यासात मागे पडतात. अशा विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाचे काम शाळेतील शिक्षिका सौ. वंदना अडसुळे करतात. त्यासाठी त्यांनी IPH या संस्थेतून विशेष प्रशिक्षण घेतले.
- हस्तकला विषयांतर्गत विद्यार्थ्यांकडून राख्या तयार करून घेतल्या गेल्या. त्या राख्यांचे प्रदर्शन व योग्य दरात विक्री दि. २४ ऑगस्ट रोजी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी यात आनंदाने सहभाग घेतला.
- स्काऊट-गाईड विषयांतर्गत सर्व स्काऊट गाईड विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास स्काऊट मास्तर श्री. तळेले, गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर, मान. मुख्याध्यापक श्री. पांचाळ, श्री. धोंडे, पर्यवेक्षक श्री. सोनावणे उपस्थित होते.
- तीन हातनाका पोलिस चौकी येथे पोलिसांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम इ. ८वीच्या गाईडने केला. सदर कार्यक्रमास मान. मुख्याध्यापक श्री. पांचाळ, गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर, सौ. चव्हाण, श्री. धोंडे उपस्थित होते.
- सकाळ विभागात इ. १० वी व दुपार विभागात इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकदिनानिमित्त शिक्षकाची भूमिका पार पाडली व इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापनाचे कार्य केले. सदर कार्यक्रमात दोन्ही विभागातील अधिकारी व सर्व शिक्षकांचा सहभाग होता.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### नर्सरी विभाग

सणांची रेलचेल असणारा श्रावण महिना १२ ऑगस्ट पासून सुरू झाला. नागपंचमी, स्वातंत्र्यदिन, नारळीपौर्णिमा आणि रक्षाबंधन सण नर्सरी विभागात मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

**नागपंचमी आणि स्वातंत्र्यदिन** १४ ऑगस्टला साजरा करण्यात आला. मुलांनी तिरंगा रंग असलेला वेश परिधान केला होता. सामूहिक प्रार्थनेनंतर शेताच्या प्रतिकृतीच्या सहाय्याने साप, नाग शेतकऱ्याचा कसा मित्र आहे ह्याची शिक्षकांनी थोडक्यात माहिती सांगितली. साप, नाग, उंदीर, किटक, छोटे प्राणी, अंडी खाणारा प्राणी आहे. तो दूध पीत नाही तेव्हा पूजा करताना त्याला दूध देऊ नये असा संदेश दिला. नागाच्या मूर्तीची पूजा करून बत्ताशाचा प्रसाद मुलांना वाटण्यात आला. आदल्या दिवशी नागाची, सापाची चित्रफीत दाखवून वेगवेगळ्या जातीच्या सापांची, नागांची माहिती करून दिली.

नंतर मुलांना स्वातंत्र्यदिनाची थोडक्यात माहिती देण्यात आली. १५ ऑगस्टला भारताचे पंतप्रधान लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करतात. मुलांना स्वातंत्र्य सैनिकांची चित्रे दाखवून त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली. तसेच मुलांना झेंड्याचा आदर कसा राखायचा

हेही सांगितले. शेवटी मुलांनी देशभक्तीपर गीते गाइली आणि घरी जाताना मोरात तीन रंगाचे भेंडीचे ठसे काम केलेले चित्र देण्यात आले.

**नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन** २४ ऑगस्टला साजरी करण्यात आली. मुलांनी नवीन कपडे घातले होते. सामूहिक प्रार्थनेनंतर शिक्षकांनी मुलांना नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाची थोडक्यात माहिती सांगितली. झाडाचे मानवी जीवनातील महत्त्व, झाडाची निगा कशी राखावी आणि जास्तीत जास्त झाडे लावून पर्यावरणाचा समतोल कसा राखावा ह्याची थोडक्यात माहिती सांगितली. मुलांनी झाडाला राखी बांधून आपली कृतज्ञता व्यक्त केली. नंतर चिमुरड्यांनी पालकांच्या मदतीने स्वतः तयार केलेली राखी एकमेकांना बांधून आणि शिक्षकांनी दिलेली नारळवडी खाऊन रक्षाबंधन साजरी करण्यात आली.

**इतर उपक्रम** : अभ्यासाबरोबरच सूक्ष्म आणि स्थूलकारक (fine and gross motor skill) विकासासाठी केर काढणे (sweeping), स्पंजच्या सहाय्याने एका भांड्यातून दुसऱ्या भांड्यात पाणी ओतणे, चिकनमाती काम, रंगकाम, ठसे काम इत्यादी उपक्रम घेण्यात आले.

प्रत्येक शुक्रवारी रंगकाम करण्याचा गृहपाठ मुलांना देण्यास सुरुवात केली.

मूल्य शिक्षणात मोबाइलवर न खेळणे, जास्त वेळ टी. व्ही. न बघणे, सर्व गोष्टी, वस्तू खेळ खाऊ एकमेकांना देण्याविषयी (sharing) इत्यादी सांगण्यात आले.

**के. जी. विभाग**

आपल्या संस्कृतीमध्ये अनेक सण येतात. प्रत्येक सणाचे महत्त्व वेगळे, जे साजरे करण्याची पद्धत वेगळी. या सर्वांची ओळख मुलांना पूर्व प्राथमिक विभागातच करून दिली जाते.

१) **दीप पूजा** : आषाढ महिन्याची अमावस्या म्हणजे दीप अमावस्या. या दिवशी दीप-पूजन केले जाते. आपणा सर्वांना प्रकाश देणाऱ्या दिवा/दीप व त्याच्या विविध रुपांच्या पूजनाचा हा दिवस. पणती, मेणबत्ती, बॅटरी, समई, निरांजन इ. सर्व प्रकारचे दिवे वर्गात मांडून त्याची पूजा केली गेली. मुलांना ही पूजा का करायची हे शिक्षकांनी सांगितले. मुलांनी 'शुभंकरोती' श्लोक म्हणून दीपकाला नमस्कार केला.

२) **नागपंचमी** : श्रावण महिन्यातील पाचव्या दिवशी म्हणजे पंचमीला नागाची पूजा केली जाते. एका लहानशा शेताच्या प्रतिकृतीवर नागाची प्रतिमा ठेवली होती; त्याची पूजा शिक्षकांनी केली. आपल्याला अन्नधान्य देणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतातील उंदीर, घूस यांना खाणारा हा साप शेतकऱ्याचा आणि पर्यायाने आपलाही मित्र आहे, हे शिक्षकांनी मुलांना सांगितले. नाग, साप याबद्दल माहिती देणारी चित्रफीत मुलांनी बघितली. ज्यूनियर के.जी.च्या मुलांनी त्यांच्या चित्रकलेच्या वहीत नागाचे चित्र रंगवून त्यावर ठसे-काम केले, तर सिनियरच्या मुलांनी नागाची चित्रे वहीत काढली. या वर्षी १५ ऑगस्टला आलेला हा सण शाळेत १४ ऑगस्टला साजरा झाला व त्या निमित्ताने मुलांना 'बत्तासे' प्रसाद देण्यात आला.

३) **१५ ऑगस्ट** : स्वातंत्र्य दिन - आपल्या भारताचा स्वातंत्र दिवस. या दिवसाच्या आधी मुलांना स्वातंत्र्य दिन म्हणजे काय व त्यामध्ये मोलाचा वाटा असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांची ओळख, त्यांचे कार्य याची माहिती देण्यात आली. झेंड्याविषयी माहिती व गाणी शिकवण्यात आली. १४ ऑगस्टला मुलांनी विविध स्वातंत्र्य सैनिकांचे (महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस) वेश परिधान केले होते. ज्यूनियरच्या मुलांनी झेंड्याचे रंग वापरून फुगे रंगवले, तर ह्याच रंगात सिनियरच्या मुलांनी फुलपाखरात रंग भरले. देशभक्तीपर गाणी म्हणून वंदे मातरम्,

भारतमाता की जय या घोषणा देत अतिशय उत्साहात हा स्वातंत्र्य दिन आमच्या चिमुरड्यांनी साजरा केला.

४) **रक्षाबंधन** : बहीण-भावाच्या नात्याचा हा श्रावणातील दिवस. बहीण भावाला राखी बांधते, भाऊ बहिणीला भेटवस्तू देतो आणि दोघही एकमेकांची काळजी घेण्याचे आश्वासन देतात. ज्यूनियरच्या मुलांना सोनेरी लेस देण्यात आली होती व त्यांनी पालकांच्या मदतीने राखी बनवून आणायची होती तर सिनियरच्या मुलांनी शिक्षकांच्या मदतीने राख्या तयार केल्या. मुला-मुलींनी एकमेकांना राख्या बांधल्या व नारळाची गोड वडीसुद्धा भरवली.

शिक्षकांनी नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन या सणाची माहिती सांगितली. झाडांचे आपल्याला किती फायदे आहेत, आपण झाडांची काळजी घेतली पाहिजे यासाठी काही मुलांनी शिक्षकांच्या मदतीने झाडांना राख्या बांधल्या व त्यांची काळजी घेण्याचे ठरवले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### 'Buddha in a Traffic Jam'

प्रत्येक महिन्यात विद्यार्थ्यांपर्यत एक नवीन व उत्तम चित्रपट पोहोचतो. तो महाविद्यालयाच्या फिल्म सोसायटीच्या आयोजनामुळे. हे चित्रपट आंतरराष्ट्रीय दर्जाचे असतात. यामुळे चित्रपटसृष्टीतील अत्यंत उत्कृष्ट विषयाचे चित्रपट विद्यार्थ्यांना पाहायला मिळतात.



४ ऑगस्ट २०१८ रोजी विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित 'Buddha in a Traffic Jam' हा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. 'बुद्धा इन अ ट्रॅफिक जॅम' या चित्रपटाची कथा एका प्राध्यापकाची आहे, जो आपल्या विद्यार्थ्यांना भारतात क्रांती घडणे किती गरजेचे आहे याबद्दल सांगतो. तसेच नक्षलवाद, भ्रष्टाचार, राजकीय-आर्थिक कंगोरे या विषयांसह चित्रपट पुढे जातो.

जवळजवळ ७० विद्यार्थ्यांनी यावेळी कात्यायन सभागृहात उपस्थिती दर्शवली.

### पॉवरपॉईट प्रेझेंटेशन स्पर्धा




महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाने 'अलीकडील विपणनातील कल' या विषयावरील केस स्टडीज्च्या पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन्स स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा ७ ऑगस्ट २०१८ रोजी पार पडली.

### इंग्रजी साहित्य मंडळाचे उद्घाटन




११ ऑगस्ट २०१८ रोजी विद्यापीठाच्या प्राध्यापक डॉ. भाग्यश्री वर्मा आणि महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या उपस्थितीत इंग्रजी

साहित्य मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. 'अर्थ आणि भावनांच्या शोधार्थ कविता' या विषयावर प्रमुख पाहुण्यांनी भाष्य केले. नाईक मॅडम यांनी प्रेरणादायी भाषण केले व काही कविता म्हटल्या.

याप्रसंगी 'Fragrance' या वॉलपेपरचेही अनावरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनाही त्यांच्या वेगवेगळ्या विषयांतील यशाबद्दल गौरविण्यात आले. कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी यांच्या अतिशय चांगल्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

**स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण**



११ आणि १२ ऑगस्ट रोजी महिला विकास विभागाने 'स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण' आयोजित केले होते. NCC आणि NSS यामधून निवड झालेल्या ३० विद्यार्थिनींना यापुढे नीतिन पंडित यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षणासाठी पाठवले. या विद्यार्थिनी आता महाविद्यालयातील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देतील.

**स्वच्छता अभियान २०१८**



विद्यार्थी संघटना आणि NSS यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात स्वच्छता अभियान आयोजित केले होते. यात १०० स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर आणि वर्ग यांची साफसफाई केली. तसेच वाणिज्य, कला आणि विधी या इमारतीही साफ करण्यात आल्या.

या अभियानाचे उद्घाटन आदरणीय प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना थोडे मोलाचे मार्गदर्शन केले व त्यानंतर या अभियानास सुरुवात झाली.

**महिला सक्षमीकरण व लिंग आधारीत हिंसेचा प्रतिबंध यावर सत्र**



DLLE आणि NSS यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सक्षमीकरण आणि लिंगावर आधारित हिंसा टाळणे' या विषयावर १४ ऑगस्ट २०१८ रोजी एका सत्राचे आयोजन केले. याप्रसंगी MAVA (Men Against Violence and Abuse) या संघटनेचे श्री. हरिश सदानी हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले. यामध्ये प्रेक्षकांशीही थेट संवाद साधला व त्यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला.

**फिल्म सोसायटी तर्फे 'द पोस्ट' अमेरिकन चित्रपटाचे सादरीकरण**

दि.१८ ऑगस्ट रोजी जोशी बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटीच्यावतीने 'द पोस्ट' या २०१७ साली प्रदर्शित

संपत्तीचे असंख्य झरे असले तरी चैनीला मर्यादा आहे. जीवनातील निवडक सुखे ही नेमस्तपणावर अवलंबून असतात. - एम. एफ. ट्युपर



झालेल्या चित्रपटाचे सादरीकरण झाले. लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी माध्यमांचे स्वातंत्र्य अधोरेखित करणारा हा चित्रपट असून ऑस्कर पुरस्काराची ८ नामांकने या चित्रपटाला मिळाली होती. चित्रपटाच्या सादरीकरणापूर्वी भारताचे भूतपूर्व पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांना त्यांच्या काही कवितांची ध्वनी चित्रफीत दाखवून श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. चित्रपटाच्या सादरीकरणानंतर विद्यार्थी व प्राध्यापक यांनी माध्यम स्वातंत्र्य, लोकशाहीच्या जडणघडणीत माध्यमाचे महत्त्व यावर चर्चा केली. Newspaper is the rough draft of history हे चित्रपटातील वाक्य सर्वांच्या मनात घर करून गेले. कार्यक्रमात ५० विद्यार्थी सहभागी झाले.

**बी एम एम विभागातर्फे सांस्कृतिक महोत्सव साजरा**



दि. २३ ऑगस्ट २०१८ रोजी, जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या बी एम एम विभागा तर्फे सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'विमर्श' या त्रैमासिकाचे संपादक श्री. अरुण करमरकर लाभले होते. यावेळी सांस्कृतिक महोत्सवात ईशान्येकडील राज्य अर्थात 'सेव्हन सिस्टर' हा विषय केंद्रस्थानी ठेवून त्यावर चर्चा झाली. संस्कृतीचा अन्वयार्थ लावणारे अभ्यासपूर्ण प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी केले.

श्री. अरुण करमरकर म्हणाले की आजपर्यंत मागच्या ७० वर्षांत पूर्वांचलचा भाग मुख्य प्रवाहात आला नाही, किंबहुना त्याकडे दिल्लीतील सरकारने कायम दुर्लक्ष केले. आसाम येथील एन आर सीच्या प्रकरणात ४० लाख बांगलादेशी घुसखोर अनधिकृतपणे राहात असून केवळ मतांच्या राजकारणामुळे हा विषय चर्चिला जात नाही. प्रत्येक भारतीय नागरिकाने पूर्वांचलचा आवर्जून नेहमी दौरा करावा व तेथील लोक हे भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहेत हे लक्षात घेऊन वागले पाहिजे. स्वित्झर्लंड पेक्षाही सुंदर असलेल्या पूर्वांचलचा अभ्यास दौरा करून त्या भागाकडे करियरच्या दृष्टीने पहावे असे आवाहन श्री. करमरकर यांनी केले.

या कार्यक्रमात भारतातील सर्व राज्यांतील विविध प्रकारच्या संस्कृतिचे दर्शन घडवणारे सादरीकरण केले होते. बी एम एमच्या द्वितीय वर्षांच्या विद्यार्थ्यांनी डॉ. महेश पाटील, डॉ. संगीता दास, डॉ. विमुक्ता राजे व प्रा. प्रशांत धर्माधिकारी, प्रा. मानसी जँगम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी सादरीकरण स्पर्धा तसेच पोस्टर मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. डॉ. जयश्री सिंग व प्रा. रुचिता गव्हाले या परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जश्न–ए–प्रेमचंद**



महाविद्यालयाचा हिंदी विभाग व कथा–कथन समूह

या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'जश्न-ए-प्रेमचंद' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ हिंदी लेखक मुन्शी प्रेमचंद यांनी लिहिलेल्या काही अजरामर कथांचे अभिवाचन करण्यात आले. हिंदी व उर्दूचे अभ्यासक व जाहिरात क्षेत्रातील स्लोगन व टॅगलाईन लेखक श्री. जमील गुलरेज यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम चितारला. जमील गुलरेज यांनी भारतीय भाषांच्या होत असलेल्या ऱ्हासाबद्दल आपल्या मनोगतात दुःख व्यक्त केले. कथाकथनाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी मनोगत व्यक्त केले.

मुन्शी प्रेमचंद यांच्या 'भूत'(हिन्दी) आणि 'बड़े भाई साहब' (मराठी) तथा इस्मत चुगताई यांची 'कैसी बीवी कैसा शौहर' आणि 'वो कौन था?' (उर्दू-हिंदी) इ. कथांचे नाट्यमयरित्या अभिवाचन करण्यात आले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. अनिल ढवळे व डॉ. जयश्री सिंग यांनी संयोजनाची जबाबदारी सांभाळली. विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. प्रभाकर आपटे यांचे 'संस्कृत व विज्ञान' विषयावर व्याख्यान**



दि. २८ ऑगस्ट २०१८, रोजी बी एम एम विभाग व संस्कृत विभाग यांनी संयुक्तपणे ज्येष्ठ भाषा तज्ज्ञ व संस्कृतपंडित डॉ. प्रभाकर आपटे यांचे संस्कृत व विज्ञान विषयावर व्याख्यान आयोजित केले. डॉ. आपटे यांनी संस्कृत भाषेचे विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात होऊ शकणारे उपयोजन या विषयावर चर्चा केली. थॉमस अल्वा एडिसनच्या ग्रामोफोनवर पहिल्यांदा मॅक्स म्युलर या जर्मन संस्कृत तज्ज्ञांनी ऋग्वेदाची पहिली ऋचा ध्वनिमुद्रित केली, ओपन हायमर याला अणुस्फोट होताना गीतेच्या ११ व्या अध्यायातील विश्वरूप दर्शना संदर्भातील श्लोक उद्धृत केला. वयाच्या ८५ व्या वर्षी डॉ. आपटे यांच्या अप्रतिहत प्रज्ञेचा आवाका वाखाणण्याजोगा होता व विद्यार्थ्यांना त्यांनी त्यांच्या वाणीने मंत्रमुग्ध केले. कार्यक्रम संयोजनाची जबाबदारी डॉ. महेश पाटील, प्रा. स्वाती भालेराव, प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी सांभाळली. दोन्ही विभागाचे असंख्य विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**गोष्टी माणसांच्या**



दि. २९ ऑगस्ट, २०१८ रोजी महाविद्यालयाच्या मराठी भाषा विभागातर्फे ज्येष्ठ अभ्यासिका वासंती वर्तक यांच्या 'गोष्टी माणसांच्या' या कथा वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वासंती वर्तक यांनी रत्नाकर मतकरी यांच्या 'वनरानी व फुल' या प्रौढ प्रेम-परीकथेचं वाचन; तसेच अन्य काही कथांचेही वाचन केलं. मराठी

ज्ञानी माणसाबरोबर एकदाच केलेले संभाषण हे दहा वर्षे पुस्तकाचा अभ्यास करण्यापेक्षा जास्त सरस आहे. - लाँग फेलो

भाषा विभाग प्रमुख प्रा. अनिल भाबड, प्रा. संतोष राणे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सम्पन्न झाला. या प्रसंगी ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, प्रा. प्रफुल्ल भोसले, प्रा. प्रशांत धर्माधिकारी तसेच अन्य प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**प्रा. नारायण बारसे यांचे व्याख्यान**




दि. ३० ऑगस्ट, २०१८ रोजी, महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाने E Resources for Research and Study या विषयावर ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. 'संशोधन व प्रगत अध्ययनात ग्रंथालयातील आधुनिक संसाधनांचा योग्य वापर कसा करावा' या विषयावर प्रा. बारसे यांनी प्रकाश टाकला. महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना हे व्याख्यान नितांत मार्गदर्शक ठरले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रश्मी अग्निहोत्री व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.

**व्याससभेत डॉ. सुचित्रा नाईक यांचे व्याख्यान**



दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी, 'शिक्षकाची पालक व समुपदेशकाची भूमिका' या विषयावर व्याससभेत व्याख्यान दिले. महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या अध्ययन अध्यापनात मूल्यवर्धन करून शिक्षणातील नवनवे विचारप्रवाह समजून घेण्यासाठी व्याससभा हा एक अनोखा उपक्रम महाविद्यालयात चालतो. महिन्यातून एकदा महाविद्यालयीन प्राध्यापक त्यांच्या संशोधन व पठण पद्धतीवर आपले विषय मांडतात.

डॉ. सुचित्रा नाईक यांनी सध्याच्या काळात शिक्षकांना पालक व समुपदेशक या भूमिकेसाठी तयार व्हायला पाहिजे असे प्रतिपादन केले. जिथे टाका सुटल्यासारखा वाटतो तिथे टाका घालणे म्हणजे खरे समुपदेशन तसेच मेंटरिंग आहे असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांना रोजच्या जीवनात पडणारे अगणित प्रश्न शिक्षक आपल्या परीने सोडवू शकतो. विद्यार्थ्यांना कठीण वाटणाऱ्या गणित, इंग्रजी, विषयांचे तसेच संभाषण कौशल्य, करियर मार्गदर्शन इत्यादी अनेक विषयांवर शिक्षक खूप चांगल्या प्रकारे मार्गदर्शक ठरू शकतो असे त्या म्हणाल्या. डॉ. नाईक यांनी आपल्या खुमासदार शैलीत विचार मांडत विषयाला अनुसरून काही चित्रफितींचे सादरीकरण केले.

कनिष्ठ महाविद्यालय तसेच वरिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांनी व्याससभेत सहभाग घेतला.

एका कर्तबगार पुरुषाच्या मागे इतर कर्तबगार पुरुषांची पुण्याई उभी असते. – चीनमधील म्हण

### श्रावण सरी – मैफिल सुरांची



जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या पन्नासाव्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्या निमित्त 'सर्ज' या माजी विद्यार्थी संघटनेने या सोबतच टॅलेंट ऍकॅडमी तर्फे 'श्रावण सरी – मैफिल सुरांची' या कार्यक्रमाचे आयोजन ०१ सप्टेंबर २०१८ रोजी करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या गौरवगीतेने झाली. हे गीत रोहन पाटील, शशांक मोहिते, ऋषी पाटील, क्षितिजा जोशी यांनी रचले आहे. यानंतर हिंदी-मराठी श्रावण गीतांची मैफिल रंगली. गांधार जोग याने अप्रतिम तबला वादन केले. तसेच हृषिकेश जोशी यांनी पियानिका वाजवले. महाविद्यालयातील १९८३ सालच्या बॅचला असलेल्या प्राची अष्टमकर यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या व त्यानंतर पुन्हा गीतांना उधाण आले, हे गीते गाणारे कलावंतसुद्धा माजी विद्यार्थीच होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रथमेश उंबरे, प्रतिक्षा पांढरे, किमया तेंडुलकर, अक्षय हेगडे, सायली देशमुख यांनी केले.

प्रमुख पाहुणेपदी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक उपस्थित होत्या. तसेच संस्थेच्या अध्यक्षा ॲड. माधवी नाईक, सचिव श्री. स्वप्नील मयेकर, खजिनदार श्री. राजेंद्र साळवी व संस्थेचे इतर सभासद उपस्थित होते.

'सर्ज' नेहमीच विविध उपक्रमांतून माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणून जुन्या आठवणींना उजाळा देण्याचे व नवनिर्मितीचे कार्य करते. कार्यक्रमाला १९८२ च्या माजी विद्यार्थी टीमने आर्थिक सहकार्य केले, अशा प्रकारे माजी विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

### शिक्षक दिन



दि. ५ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात शिक्षक दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी एक दिवस स्वतः शिक्षक बनून वर्गावर तासिका घेतल्या व शिक्षक म्हणून काम करण्याचा आनन्द व अनुभव घेतला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी सहभागी विद्यार्थ्यांना गौरवले.

### युट्युबर्स मीट



महाविद्यालयाच्या स्वयं अर्थसहाय्यीत विभागाचा ख्रिसलीस हा कार्यक्रम दि. ८ सप्टेंबर रोजी होणार असून त्याचाच एक भाग म्हणून दि. ५ सप्टेंबर रोजी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले, तसेच दि. ६ सप्टेंबर रोजी युट्युबर्स मीट या अनोख्या कार्यक्रमाचे

---

उपदेश हा चुंबनासारखा असतो. तो द्यायला खिशातले काही जात नाही,
उलट द्यायलाही गंमत वाटते! – फ्रेंच म्हण

आयोजन करण्यात आले. बदलत जाणाऱ्या समाज माध्यमात युट्युबचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या माध्यमातून अनेक व्हिडिओ तयार करून अपलोड करता येतात. कार्यक्रमात युट्युबर सौरभ सिन्हा, मराठी कॅफे या लोकप्रिय युट्युब चॅनेलच्या श्री. टाक व श्री. पाटील यांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक होत्या तसेच उपप्राचार्य प्रा. मोनिका देशपांडे, तसेच ख्रिसलीस समन्वयक प्रा. पूर्वा गायकवाड व प्रा. सिंधू नटूवेटी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना समाज माध्यमातील कोणत्या संधी उपलब्ध आहेत यावर ऊहापोह करण्यात आला.

### संस्कृत दिन समारोह



दि. ७ सप्टेंबर, २०१८ रोजी महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग व संस्कृतभारती या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत दिनाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला संस्कृत भारतीच्या कोकण प्रांत सहमंत्रिणी सौ. श्यामला भट प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी संस्कृत भाषा व त्यातील विलक्षण सुंदर साहित्यावर प्रकाश टाकत या भाषेच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. संस्कृत भाषेच्या संभाषणासोबत त्यातील संशोधनाकडे देखील संस्कृत विभागाने मोठे काम करणे आवश्यक आहे असे त्या म्हणाल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात सौ. श्यामला भट म्हणाल्या की, संस्कृत हा भारताचा आत्मा असून केवळ धार्मिकच कार्यक्रम करण्यास संस्कृत भाषा उपयुक्त नसून त्यातील विज्ञान आणि तंत्रज्ञान देखील अभ्यासण्याजोगे आहे. संस्कृत भाषेच्या संभाषणाच्या माध्यमातून संस्कृत भाषेला लोकवाणी करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विभिन्न विषयांवर संस्कृत गीते, नाटके सादर केली. संस्कृत भाषेतील अनोखा सांगीतिक बँड हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना भावून गेला. कार्यक्रमाचे संयोजन संस्कृत विभाग प्रमुख प्रा. स्वाती भालेराव यांनी केले. कार्यक्रमास बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### Tea with Research Scholars



महाविद्यालयाच्या रिसर्च कमिटीने दि १० सप्टेंबर रोजी Tea with Research Scholars हा कार्यक्रम आयोजित केला. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे व डॉ. जयश्री सिंग उपस्थित होत्या. डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, संशोधन हा अध्यापकाचा स्वभाव बनायला हवा. नवीन अध्यापकांनी एम फील व पीएचडी साठी संशोधन करण्यास तयार व्हावे; तसेच दर्जेदार संशोधन नियतकालिकात शोधनिबंध लिहावे. यासाठी 'जिज्ञासा' हे समर्पक नाव डॉ. नाईक यांनी सुचवले. मुंबईतील व एकूणच राष्ट्रीय दर्जाच्या संस्थांकडून संशोधन वृत्ती मिळवावी, तसेच संशोधनासाठी निधी देणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने महाविद्यालयीन

संशोधनात विद्यार्थी व प्राध्यापक या दोघांनाही सामावून घेऊन राष्ट्र निर्मितीसाठी काम करायला बराच वाव आहे असे डॉ. नाईक म्हणाल्या. तसेच विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' या मासिकासाठी देखील प्राध्यापकांनी लेखन करावे असे डॉ. नाईक यांनी आवाहन केले. मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या आविष्कार २०१८–१९ या संशोधन स्पर्धेत विद्यार्थ्यांना अधिकाधिक भाग घेऊन प्रेरित करता येईल किंबहुना संशोधनाची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये प्रफुल्लित करावी असे त्या म्हणाल्या. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### Teaching and Learning - Fun, Participative and Creative या विषयीच्या कार्यशाळेचे आयोजन

Teaching and Learning - Fun, participative and Creative या विषयीच्या कार्यशाळेचे आयोजन शनिवार दि. १४ जुलै २०१८ रोजी तंत्रनिकेतनतर्फे A.V. रुममध्ये करण्यात आले. सदरचा कार्यक्रम प्रोफेसर व्ही. एस. भाकरे स्थापित 'Winners Circle' च्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. सदर उपक्रम शिक्षक, विद्यार्थी आणि संपूर्ण Teaching आणि Learning प्रक्रियेवर प्रकाश टाकणारा आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांचे उत्तम निरिक्षण करीत असतो आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची ज्योत फुलवित असतो. शिवाय वर्गात तो वेगवेगळ्या पद्धती वापरून ज्ञानदान करीत असतो. 'शिकण आणि शिकवण' हे शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाची दोन अंगे आहेत.

सदर कार्यक्रमास श्री. संतोष कुमार (External Manufacturing Manager Mondelez India Food Ltd., Thane) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर प्रसंगी डॉ. दि. कृ. नायक, (प्राचार्य, वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) यांनी Teaching Learning पद्धतीविषयी माहिती उपस्थितांना करून दिली. त्यांनी आपल्या सादरीकरणातून जीवनात यशस्वी झालेल्या व्यक्तिमत्त्वांचा परामर्श घेतला.

प्रोफेसर व्ही. एस. भाकरे (संस्थापक सदस्य, 'Winners Circle') यांनी सद्याच्या शिक्षण प्रणालीतील गुणदान आणि श्रेणी पद्धत कशी अयोग्य आहे हे उपस्थितांना पटवून सांगितले. 'SUGGESTOPEDIA' या उदाहरणाद्वारे त्यांनी 'शिकणं आणि शिकविणं' आणि श्रेणीबद्ध शिक्षण हे कसं अनेकांना समाविष्ट करून घेता येईल आणि ते नवनिर्मित आणि आनंददायक होईल या विषयीची माहिती दिली.

'SUGGESTOPEDIA' शिक्षण पद्धती बल्गेरियन मानसशास्त्रज्ञ जिऑर्गी लोझानोव्ह यांनी विकसित केली. या पद्धतीमध्ये उच्च ज्ञानद्रिंये, अपेक्षित यश प्राप्त करण्यासाठीच्या विविध पद्धती, त्यामध्ये पाठ्यपुस्तके, संगीत आणि खेळामध्ये आणि गाण्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग इत्यादी समावेश असतो. शिवाय ताण–तणावाच्या प्रसंगी कशी मुक्ती मिळवावी याचेही प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

सदर कार्यक्रमास जवळ–जवळ ३० विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते.

### श्री. चंद्रकांत शिंगाडे CBSE - UGC - NET परीक्षा उत्तीर्ण



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ग्रंथालयातील ग्रंथालय सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत सुखदेव शिंगाडे यांनी दि. ८ जुलै २०१८ रोजी घेण्यात आलेल्या CBSE - UGC - NET परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. त्यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात परीक्षा दिली होती.

माझे आजोबा किती मोठे होते हे मला माहीत नाही; पण त्यांचा नातू काय किंमतीचा ठरणार आहे यात मला जास्त स्वारस्य आहे! – अब्राहम लिंकन

श्री. शिंगाडे हे तंत्रनिकेतन ग्रंथालयात सन १९९७ (नोव्हेंबर) पासून ग्रंथालय सहाय्यक पदावर काम करीत आहेत. त्यांनी दि. ८ जुलै २०१८ रोजी CBSE - UGC - NET परीक्षा दिली होती. त्यांचा निकाल ३१ जुलै २०१८ रोजी लागला आणि त्या परीक्षेत श्री. शिंगाडे यांनी NET परीक्षा Qualified केली आहे.

तत्पूर्वी मागील वर्षी सन २०१७ मध्ये पुणे विद्यापीठ आयोजित UGC - SET परीक्षेतही श्री. शिंगाडे उत्तीर्ण झाले होते. आता ते SET / NET दोन्ही परीक्षा ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात उत्तीर्ण आहेत.

**Talk Show - IT Industry Scenario चे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे Talk Show अंतर्गत IT Industry Scenario ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम दि. २१ जुलै २०१८ रोजी पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख व्यक्ती म्हणून श्री. महेश यादव (Sr. Consultant, Core Compete) श्री. नितेश तावडे (Sr. Sowftware Dev. BNP Paribas) आणि श्री. भास्कर आजगांवकर (Proprietor SB cart online services) हे होते.

सदर कार्यक्रम आयोजनामागचा प्रमुख हा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध संधी जाणून घेणे हा होता. ४९ विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमास उपस्थिती लावली व जवळ जवळ तीन तास कार्यक्रम चालला. वरील तिन्ही प्रमुख व्यक्ती ह्या वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या माजी विद्यार्थी होत हे विशेष.

**Electro-Vission 2018 - एक दिवसिय चर्चासत्र**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रीक पॉवर सिस्टिम (EPS) विभागातर्फे Electro-Vission 2018 या विषयीचे एक दिवसिय चर्चासत्र दि. २१ जुलै २०१८ रोजी पार पडले.

सदर चर्चासत्रामागचा उद्देश असा होता की, विद्युत जगतातील नव-नवीन तंत्रज्ञानाची ओळख, विद्युत सुरक्षितता, बाह्य औद्योगिक संबंध आणि समाजासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये नीतीमूल्ये रुजवणे, औद्योगिक गरज आणि त्यासंबंधीचे शिक्षण आणि सद्यस्थितीत भारतातील ऊर्जा क्षेत्राची स्थिती आणि शिवम उदयोन्मुख ऊर्जा क्षेत्रातील माहिति इत्यादी संबंधी चर्चा करणे होय.



सदर चर्चासत्राचे उद्घाटन श्री. महेश हिवरेकर (Country Head EHS - Energy Management Division Siemens Ltd. India) यांनी केले. त्यांनी औद्योगिक क्षेत्रात विद्युत सुरक्षितता दिवसेंदिवस कशी महत्त्वाची आहे ह्याविषयीचे मत मांडले. औद्योगिक परिसरात वेगवेगळे औजारे (Tools) मशीन्स कशी सुरक्षितपणे हाताळली जावीत हे सांगितले.




सौ. छाया भोसले (Quality Assurance & Inspection - Electrical, Tata Power Co. Ltd., Mumbai) यांनी पॉवर सिस्टिम मधील अभियंत्याची

भूमिका आणि जबाबदारी विषयीचे विवेचन स्पष्ट केले. पदविकाधारकांना येणाऱ्या काळात पॉवर सिस्टिममध्ये चांगल्या संधी असणार आहेत असेही त्यांनी सांगितले. ऊर्जा आणि आर्थिक विकास, ऑन लाईन मॉनिटरिंग इत्यादी संबंधीची माहिती उपस्थितांना करून दिली व शेवटी पॉवर इंडस्ट्रीमधील औद्योगिक पर्यावरण आणि तरुण अभियंत्याकडूनच्या अपेक्षा व्यक्त केल्या.

**वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनमधील श्री. चंद्रकांत शंकर काळे सेवानिवृत्त**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनमधील इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम (EPS) विभागातील श्री. चंद्रकांत शंकर काळे हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी सेवानिवृत्त झाले.

श्री. काळे हे इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम विभागात १९८५ पासून कार्यरत होते. तंत्रनिकेतन मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून त्यांना अगदी साध्या पद्धतीने भेटवस्तू देऊन निरोप दिला.

नुकतेच जून २०१८ रोजी त्यांच्या मोठ्या मुलाचे अपघाती निधन झाल्यामुळे ते अत्यंत भावूक झाल्याचे दिसत होते. निरोप समारंभ प्रसंगी ते आपल्या भावना व्यक्त करीत असताना त्यांना अश्रू अनावर झाले. सर्वच सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. प्रसंगी त्यांच्या विषयीच्या आठवणी श्री. चंद्रकांत शिंगाडे आणि श्री. अनंत कुवर यांनी सांगितल्या. तंत्रनिकेतनच्या कर्मचारी युनियन तर्फे त्यांना भेटवस्तू देण्यात आली व सर्व सदस्यांनी त्यांचे पुढील आयुष्य आरोग्यपूर्ण व भरभराटीचे जावो अशा सदिच्छा दिल्या.

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून – **विकासवेध–०९: जगातील सर्वात मोठा प्रकल्प**)

आपल्याला आणखीनच अभिमानास्पद वाटू लागेल. भारताचा जगद्गुरू होण्याचा महामार्ग, जगातील 'आधार' ह्या सर्वात मोठ्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीने प्रशस्त होईल.

**संदर्भः**


१. आता हे सांगता येईल (नाऊ इट कॅन बी टोल्ड), मॅनहटन प्रकल्पाची कहाणी, एडवर्ड टेलर यांच्या नव्या परिचयासहित. लेखकः जनरल लेस्ली ग्रूव्हज. प्रकाशकः द कॅपो प्रेस. प्रकाशनकालः १९८३. पृष्ठसंख्याः ४९६, मूळ भाषा : इंग्रजी. सूची किंमत : २० अमेरिकन डॉलर्स. मराठी अनुवाद : नरेंद्र गोळे (अप्रकाशित).

२. एन्रिको फर्मी : अणुयुगाचा प्रणेता. मराठी अनुवाद: नरेंद्र गोळे (अप्रकाशित). मूळ इंग्रजी लेखक: टेड गॉटफ्रीड, प्रकाशक: युनिव्हर्सिटी प्रेस, प्रकाशन काल : १९९९, मालिका: आधुनिक युगाचे कर्ते, वितरक: ओरिएंट लाँगमन लिमिटेड, किंमत: रु.१२५/- फक्त.

३. रिबूटींग इंडिया– रिअलायझिंग अ बिलिअन ॲस्पिरेशन्स, नंदन निलेकणी व विरल शहा, ॲलन लेन (पेंग्विन बुक्स), २०१५, किंमतः रु.७९९/-.

४. आधारपत्रावरील विकिपेडियाचे संकेतस्थळ https://en.wikipedia.org/wiki/Aadhaar.


**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

प्रमुखपद त्यांनी १७ वर्षे भुषविले. श्रोडिंगर यांचा जन्म ऑस्ट्रियामधील व्हिएन्ना या प्रसिद्ध शहरात झाला होता. ते नाझीवादा विरुद्ध होते. साहजिकच जर्मनीनी ऑस्ट्रियावर स्वारी केल्यावर त्यांना तिथून पलायन करावे लागले. ते इटालीमध्ये असतांना वॅलेरा यांनी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना आयर्लंडला बोलवून घेतले.

श्रोडिंगर ही कोणी विज्ञानातील साधी आसामी नव्हती. १७ व्या शतकापासून प्रचलित असलेल्या, परंपरागत न्यूटन भौतिकीला २० व्या शतकाच्या सुरवातीला भौतिकशास्त्रातील नवीन दृष्टीकोनांनी धक्के द्यायला सुरवात केली. १९०० साली मॅक्स प्लँक (Max Plank, 1858-1947) यांचा पुंजवाद (quantum theory), १९०५ आणि १९१५ मध्ये मांडलेला आइन्स्टाईन (Albert Einstein 1879-1955) यांचा सापेक्षतावाद, आणि या सिद्धान्तानाच पुष्टी देऊन नील्स बार (Niels Bohr 1885-1962), हायजेनबर्ग (Werner Heisenberg 1901-1976), रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheirmer 1904-1967) यांनी विशेष संशोधन करून या नवभौतिकाचा पाया रचला.

श्रोडिंगर यांचे यातले योगदान हे फार महत्त्वाचे आहे. क्वान्टम् सिद्धान्ताचे मूलभूत समीकरण श्रोडिंगर यांनी सूत्रबद्ध केले. ही पार्श्वभूमी असलेल्या श्रोडिंगर यांना डी वॅलेरा यांनी आयर्लंडला बोलवून नवभौतिकी मधील संशोधनाला प्रचंड ऊर्जा दिली. डी वॅलेरा हे स्वतः एक गणिती होते. साहजिकच त्यांच्या राजकीय दृष्टीकोनावरती सुद्धा त्याचा प्रभाव पडलेला दिसतो. डब्लीन येथे राहून श्रोडिंगर यांनी नवभौतिकीच्या संशोधनाला पोषक असे अनेक सिद्धान्त मांडले. म्हणूनच त्यांनी १९४३ साली दिलेल्या What is Life? या व्याख्यानांना विज्ञानामध्ये एक अनन्यसाधारण महत्त्व आहे.

जनुकांच्या रचनेचा आराखडा १९५३ साली जेम्स वॅटसन् (James Watson 1928, Alive) आणि फ्रॉन्सिस क्रीक (Francis Crick 1916-2004) यांनी मांडला. वॅटसन यांनी श्रोडिंगर यांचे What is Life? हे पुस्तक वाचले होते. DNA च्या रचनेची मांडणी करताना वॅटसन आणि क्रीक यांना श्रोडिंगर यांनी मांडलेल्या सिद्धान्ताचा फायदा झाला. श्रोडिंगर यांच्यावरती उपनिषद आणि वेदांतातील तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव होता. म्हणून तरी त्यांच्या व्याख्यानाचे १९४४ साली प्रकाशित झालेले पुस्तक What is Life? हे प्रत्येक भारतीयांनी वाचण्यासारखे आहे. धर्म आणि तत्त्वज्ञानाची इतकी चांगली सांगड क्वचितच बघायला मिळते.

या पार्श्वभूमीवर बुद्धीदेवता गणपतीचा महाराष्ट्रात सप्टेंबरमध्ये साजरा होणारा सण, आणि राजकारण्यांनी त्याला दिलेले बकाल आणि हिडीस स्वरूप बघायला लागते. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्यामध्ये इंग्रजाच्या विरुद्ध लोकमत तयार करण्याकरता प्रबोधनाचे एक माध्यम म्हणून हा सण सार्वजनिक केला. आज राजकारण्यांनी त्याचे व्यावसायिकीकरण करून ते आपल्या प्रसिद्धीचे एक माध्यम बनवले आहे. व्याख्यान आणि आरत्यांची जागा हळूहळू टुकार गाणी आणि अंगविक्षेपी नाचाने घेतली. गणपतीच्या आगमनाच्या आणि विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये होणारे ध्वनी प्रदूषण, किळसवाणे नाच, आणि गाणी निमुटपणे बहुसंख्य जनतेला सहन करावी लागतात.

रस्त्यावर बेकायदा टाकलेले मंडप आणि ध्वनीप्रदूषण टाळण्याकरता न्यायालयाने अनेक निर्बंध घातले. डी. जे. वरील बंदी हा असाच एक निर्णय, पण दुर्दैवानी सगळ्या राजकीय पक्षांच्या स्थानिक नेतृत्त्वानी अशी बंदी आम्ही जुमानत नाही असे सांगून विसर्जनाच्या मिरवणूकांमधून डी. जे. वाजवला. अशा धटींगणशाहीला बळ मिळते ते फक्त सरकार आणि पोलिसांच्या

कला ही एवढी अफाट आहे आणि माणसाची बुद्धी तर एवढी आकुंचित आहे की, एका प्रतिभावंताला फक्त एकच शास्त्र पुरेसे आहे. – पोप

नाकर्तेपणामुळे. गेल्यावर्षी ठाण्यामध्ये दहिहंडीच्या थरांची मर्यादा ओलांडून आम्ही थर लावणार असे फलक, आणि जाहिराती देण्यात आल्या. गेल्या वर्षीच्या या कायदेभंगाची यावर्षीही जाहिरात करण्यात आली. यावर्षी या मंडळाला पहिली भेट देतात ते ठाण्याचे पोलिस महानिरिक्षक !!!

अरे मनाची नाही तरी जनांची तरी थोडी लाज ठेवाल की नाही?

डी. जे. परवडला पण ढोल नको अशी सध्याची परिस्थिती आहे. वृत्तपत्रापासून दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या हे पावणारे गणपती, मिरवणुकांतील ढोल वादन यांचे रसभरीत वर्णन करून या कायदेभंगाला अप्रत्यक्षरीत्या हातभारच लावत असतात. दहीहंडी पासून नवरात्रीपर्यंतच्या सर्व सणांचा आपण एकच 'सण' करून टाकलाय, तो म्हणजे 'शिमगा'.

आर्थिक मागासलेपणाकरता सवलती मिळाव्यात म्हणून लाखांचे मोर्चे काढले जातात. अनेक सार्वजनिक गणपतींच्या सजावटी, आणि मिरवणुकांचे खर्चाचे अंदाजपत्रक ५० लाखांच्या घरात असते. अशी शेकडोंनी मंडळे मुंबई, पुणे आणि उर्वरित महाराष्ट्रात आहेत. काही हजारो कोटींचा खर्च यावेळी केला जातो. तोच प्रकार दहीहंडीच्या बक्षीसांचा. तरीही यात सहभागी होणारा 'बहुसंख्य' समाज 'आम्ही मागासलेले आहोत' म्हणून मोर्चे काढतात!!!

लाखो रुपये खर्चून साजरे केलेले हे सण, हे आर्थिक मागासलेपणाचे लक्षण आहे की घसरलेल्या अभिरुचीचे? दांभिकतेला तरी काही सीमा?

प्रज्ञा परीक्षेपासून तशा सगळ्याच क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राची होणारी पिछेहाट आणि राजकीय वरदहस्ताखाली वाढत जाणारा सणांचा उन्माद याचा आपण कधीतरी गांभिर्यानं विचार करणार आहोत का?

Global Technology Index मध्ये भारताचा क्रमांक ४२ वा आहे तर चीनचा ३० वा. Economic Sunvry of India प्रमाणे दर १० लाख भारतीयांमागे १५६ शास्त्रज्ञ आहेत, चीनमध्ये १,११३, तर इस्राइलमध्ये ८,२५५. बुद्धीची उपासना कुठे जास्त चालू आहे?

डी वॅलेरासारखे विवेकी राजकीय नेतृत्व निसर्गातील कूटप्रश्न सोडवण्याकरता विज्ञानाचा स्वीकार करते, तर सणांना ध्वनी प्रदूषण आणि उन्मादी करणारे अविवेकी राजकीय नेतृत्त्व परंपरा, संस्कृती आणि अभिरुची सगळ्यांनाच रसातळाला घेऊन जाते.

''विवेक'' हा सुद्धा जसा तुमच्या बुद्धीत असतो तसाच 'अविवेक' हा सुद्धा तुमच्या बुद्धीतच असतो. तुमच्या बुद्धीची देवता तुम्हीच आहात. तुम्हाला 'विवेक' हवा की 'अविवेक'? हे तुमचे तुम्हीच ठरवायचं आहे, न्यायालय किंवा सरकारनी नाही.

**– डॉ. विजय बेडेकर**

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.